ओ/२९४

श्रीगजानन प्रसन्न

सन्मार्ग उपदेश.

TRANSLATION

हें पुस्तक.

शिवराम वामन जोशी मु० अलिबाग

यांनीं

तयार करून.

गणपत कृष्णाजीच्या छा० छा

प्रसिद्ध केलें.

हें पुस्तक मिळण्याचें ठिकाण–बाळकृष्ण लक्ष्मण पाठक. मोतीबाजार–मुंबई.

किंमत ५ आणे.

२०६

डा० मोरेश्वर गोपाळ
ऊर्फ
नानासाहेब देशमुख
यांस
हें पुस्तक,
त्यांच्या ठिकाणीं वसत असलेली थोर
विद्वत्ता, स्वदेशप्रीति, परोपकारित्व
व
विशेषतः
विद्यार्थी वर्गाविषयीं अंतःकरणपूर्वक
कळकळ
यांस अनुलक्षून
प्रेमपुरःसर अर्पण केलें असे.

नम्र विद्यार्थी,
शिवराम वामन जोशी.

टीप—७२ पेजांत २८ वी लाईन—सुखावह होण्याची पद्धति सुव्यक्त करणें एवढाच होय.

Recd 21 July 1905
Registered 2 of 1905/6
A

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

सन्मार्गोपदेश.

... व्हर्नॅक्युलर ट्रॅन्स्लेशन सोसाइटी, पुणें. १८९४.
... VERNACULAR TRANSLATION SOCIETY. POONA. 1894.

हें पुस्तक

शिवराम वामन जोशी मु० अलिबाग

यांनीं तयार केलें.

तें

मुंबईंत " गणपत कृष्णाजी " छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति पहिली २००० प्रति.

शके १८२७ संवत् १९६१ सन १९०५

किंमत ५ आणे.

सर्व हक्क ग्रंथकर्त्यांनें आपणाकडे ठेविले आहेत.

प्रस्तावना.

"विषमोऽपि विगाह्यते नयः कृततीर्थः पयसामिवाशयः ॥
स तु तत्र विशेषदुर्लभः सदुपन्यस्यति कृत्यवर्त्म यः ॥१॥"

भारवी—किरातार्जुनीय.

मनुष्याच्या आयुष्य-क्रमामध्यें कित्येक कर्तव्यें अशीं असतात कीं, त्यांची परिसमाप्ति कधींच व्हावयाची नाही 'ज्ञानसंपादन' अशा कर्तव्यांपैकींच एक आहे. ज्ञान हें अमर्याद आहे, कितीहि शिकलें तरी संतृप्ति किंवा जिज्ञासातृप्ति होत नाहीं असें ह्मणून ज्ञानसंपादनाविषयीं उदासीन राहणें किंवा तत्प्राप्त्यर्थ मुळींच यत्न न करणें ह्मणजे स्वकर्तव्याचें उल्लंघन करणें आहे. आतां, एखाद्या शास्त्राचें कितीहि अध्ययन केलें, तरी तें अपुरेंच आहे, असें मानणारे अनेकशास्त्रज्ञ लोक आजपर्यंत होऊन गेले आहेत ही गोष्ट खरी आहे; पण एकापेक्षां दुसरा मोठा, दुसऱ्यापेक्षां तिसरा मोठा, अशा श्रेष्ठपरंपरेनें अनेक विद्वान् लोक कीर्तिरूपानें विद्यमान आहेत, हें विचारपूर्वक लक्ष्यांत आणिलें असतां, ज्ञानसंपादनास्तव होईल तितका प्रयत्न करणें हें मनुष्याचें कर्तव्यकर्म आहे असें दिसून येईल.

विद्वन्मुकुटमणी वामनपंडितानीं ह्मटलें आहे:—

आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं ॥
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ॥

या न्यायानें, विद्यादेवीचा महिमा जरी अगाध आहे तरी स्वसामर्थ्यानुसार विद्यादेवीची सेवा घडावी अशा उत्कट इच्छेनें प्रस्तुत पुस्तक लिहिण्याचा उपक्रम केला आहे. प्रस्तुत पुस्तकांतील विषयांची निवड व त्यांचें स्पष्टीकरण मुख्यतः

प्रौढ विद्यार्थीवर्गाला उपयोगी व्हावें असें धोरण आरंभापासून ठेविलें आहे. हल्लीं मराठी भाषेंत शालोपयोगी अनेक पुस्तकें प्रसिद्ध होत आहेत. पण बहुतेकांचा कटाक्ष मुख्यत्वेंकरून भाषांतरावर बराच दिसतो. यामुळें, नवीन स्वतंत्र विचारांचें एक पुस्तक मुख्यत: प्रौढविद्यार्थीवर्गाकरितां असावें असें वाटल्यावरून प्रस्तुत पुस्तकाची रचना केली आहे. आतां ती कितपत उपयुक्त व सफल झाली आहे, ह्याचा निर्णय करणें वाचकांकडेसच आहे.

पुस्तकरूपानें बहुजनसमाजापुढें येण्याचा हा प्रथमचाच प्रयत्न असल्यामुळें प्रसंगविशेषीं कोठें सदोष होण्याचा संभव आहे. पण मोरोपंतांनीं ह्मटल्याप्रमाणें–

कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ॥

या वाक्याकडे लक्ष्य देउन व भगवान् श्रीकृष्णाच्या

'सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः'

या उक्तीवर पूर्ण निष्ठा ठेवून प्रस्तुत प्रयत्न केला आहे. शेवटीं 'हंसक्षीरन्याया' नें गुणग्रहण करून विद्वज्जनांनीं गुणदोषस्थलांचें स्पष्ट दिग्दर्शन करावें, व परमेश्वरकृपेनें मातृभाषेची सेवा करण्यास उत्तेजन मिळावें अशी इच्छा प्रदर्शित करून हा अल्प प्रस्तावनालेख येथेंच पुरा करितों.

अलिबाग,
ता० १४।४।०५

सर्वांचा नम्र हितैषी
शिवराम वामन जोशी.
अलिबाग.

अनुक्रमणिका.

॥ श्रीगजानन ॥

सन्मार्गोपदेश

प्रकरण १ लें.

वर्णाश्रमविचार.

" स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ॥
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति तच्छृणु ॥१॥
यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ॥
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥२॥"

श्रीमद्भगवद्गीता. अध्याय १८.

जगामध्यें ' काळ ' ही एक अमूल्य– जिचें मोल करणें मानवी शक्तीच्या बाहेर आहे– अशी वस्तु आहे. कोटयवधि रुपये खर्चिले अगर भगीरथ प्रयत्न केले, तरी गतकालाची प्राप्ति पुनः कधींही व्हावयाची नाहीं. आजपर्यंत कोणताहि प्राणी किंवा वस्तु काळाच्या तावडींतून सुटली नाहीं इतकेंच नव्हे, तर ज्यांनीं आपल्या अक्षय्य कीर्तिप्रदीपानें जगद्रूप विस्तीर्ण रंगभूमि प्रकाशित करून ठेविली आहे, अशीं अनेक मानवरत्नें शेवटीं कालवश झालीं आहेत ! ' गेलि आजची घडि नये उद्यां ' हें वाक्य अक्षरशः खरें आहे. काळाची गति अमर्यादित आहे. तो आपल्या नकळत केव्हांच पार निसटून

जातो याची आपणास दाद सुद्धां नसते! मी मी ह्मणविणारीं मोठमोठीं बलाढ्य राष्ट्रें सुद्धां या राक्षसी काळानें आपल्या घशांत टाकून गट्ट केलीं आहेत, मग आपणा मानवांची ती काय कथा! सारांश, जगांत काळासारखी सर्वव्यापी वस्तु कोणतीच नाहीं असें ह्मटलें तरी चालेल.

परमेश्वरानें जगांत अनंत प्राणी निर्माण केले आहेत. क्षुद्र कीटकांपासून तों सार्वभौम राजापर्यंत प्रत्येकामध्यें कांहीं तरी वैचित्र्य आहे. हें वैचित्र्य व्यक्तिदृष्ट्या होय. वर्गीकरणपद्धतीनें प्राण्यांचे मुख्य दोन भेद होतात. एक बुद्धिसंपन्न आणि दुसरा बुद्धिहीन. बुद्धिसंपन्न प्राण्यांचें अग्रेसरत्व मनुष्यवर्गाकडे आहे. मनुष्यानें बुद्धिप्रभावानें अनेक गोष्टी घडवून आणिल्या आहेत. पंचमहाभूतांवरहि बुद्धीनें आपला अंमल गाजवून त्यांना आपले दासानुदास बनविलें आहे! हें तर काय, पण पंचमहाभूतांवरहि ज्यांची सत्ता आहे, त्या कालमहाराजांवर देखील बुद्धीनें आपली ताण करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं! हत्तीला अंकुश आपल्या ताब्यांत ठेवूं शकतो. त्याप्रमाणें, काळ जरी सर्वव्यापक आहे, तरी एका दृष्टीनें पाहतां काळावरसुद्धां बुद्धीचें वर्चस्व आहे असें ह्मणावें लागतें ! काळ ह्मणजे काय, त्याची योग्यता किती मोठी आहे, काळाचा सदुपयोग करणें किती हितावह आहे, काळाचा अपव्यय केला असतां किती भयंकर हानि होते, व चातुर्यानें आणि नियमितपणानें वागलें असतां काळ आपला कसा अंकित होऊन राहतो, हें विचारी मनुष्याच्या सहज ध्यानांत येईल. सारांश, बुद्धीच्या योगानें काळाला आटोक्यांत ठेवितां येऊन त्याचा योग्य उपयोग करून घेतां येतो.

आजपर्यंत जगांत जे जे मोठे विद्वान् व प्रसिद्ध पुरुष होऊन गेले त्यांनीं कालमहिमा जाणिला होता; ‘ मनुष्यदेह

वारंवार प्राप्त होत नसतो ' हें तत्व त्यांच्या हृत्पटलावर प्रतिबिंबित झालें होतें, जन्मसार्थक्याची कल्पना त्यांच्या मनांत जागृत होती; असें त्या थोर महात्म्यांच्या चरित्रांवरून स्पष्ट दिसून येतें. यावरून, जगामध्यें ज्याला कीर्तीनें किंवा संपत्तीनें मोठेपणा मिळविण्याची प्रबल इच्छा असेल, त्यानें मुख्यतः काळाचा सदुपयोग करावा, हें उघड आहे.

मनुष्य जन्मास आल्यापासून त्याचें प्राणोत्क्रमण होईपर्यंत मधली जी कालमर्यादा तिला ' आयुष्य ' ह्मणतात. आयुष्य हा काळाचाच एक अंश असल्यामुळें त्याच्या ठिकाणींहि अमूल्यत्वचंचलत्वप्रभृति गुण प्ररूढ होणें स्वाभाविक आहे ! मनुष्याला आयुष्यासारखी अमूल्य वस्तु कोणतीच नाहीं. आयुष्याची मर्यादा संपल्यावर एक क्षणहि मिळावयाचा नाहीं. बरें, जो क्षण गेला तो पुनः मिळण्याची आशाच नको. आपणाला जी काय इतिकर्तव्यता करावयाची असते, ती आयुष्याच्याच जोरावर ! 'आप गये तो सब डुब गये दुनिया' अशी एक ह्मण आहे. तिचा अर्थ आपलें आयुष्य सरलें कीं सगळा संसार आटपला ! यासाठीं परमेश्वरानें कृपादृष्टीनें जोंपर्यंत आपणास आयुष्य दिलें आहे, तों पर्यंत निरंतर त्याचा सद्व्यय करणें अत्यंत श्रेयस्कर आहे.

सृष्टीच्या उत्पत्तिकाळीं परमेश्वरानें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चतुर्वर्णाची स्थापना केली, असें मनुस्मृतींतील पुढल्या श्लोकांत सांगितलें आहे.

> लोकानां तु विवृद्धयर्थं मुखबाहूरुपादतः ॥
> ब्राह्मणं क्षत्रियं वैश्यं शूद्रं च निरवर्त्तयत् ॥ १ ॥
>
> मनुस्मृति अध्याय १ श्लोक ३१.

याचा अर्थ, भगवंतानें सृष्टीच्या प्रारंभीं लोककल्याणासाठीं मुख, बाहु, ऊरु व पाद यांपासून अनुक्रमें ब्राह्मण, क्षत्रिय,

वैश्य आणि शूद्र या चतुर्वर्णांची स्थापना केली. या प्रत्येक वर्णाचीं निरनिराळीं कर्तव्यकर्मै सांगितलीं आहेत.

ब्राह्मणांचीं कर्तव्यें–

अध्यापनं अध्ययनं यजनं याजनं तथा ॥
दानं प्रतिग्रहं चैव ब्राह्मणानामकल्पयत् ॥ १ ॥
मनुस्मृति अ० १ श्लोक ८८.

शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ॥
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ १ ॥
श्रीभगवद्गीता अ० १० श्लोक ४२

क्षत्रियांचीं कर्तव्यें–

प्रजानां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च ॥
विषयेष्वप्रसक्तिश्च क्षत्रियस्य समासतः ॥ १ ॥
मनुस्मृति अ० १ श्लोक ८९.

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ॥
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ १ ॥
श्रीभगवद्गीता अ० १८ श्लोक ४३

वैश्यांचीं कर्तव्यें–

पशूनां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च ॥
वणिक्पथं कुसीदं च वैश्यस्य कृषिमेव च ॥ १ ॥
मनुस्मृति अ० १ श्लोक ९०

कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ॥
श्रीभगवद्गीता अ० १८ श्लोक ४४

शूद्रांचीं कर्तव्यें–

एकमेव तु शूद्रस्य प्रभुः कर्म समादिशत् ॥
एतेषामेव वर्णानां शुश्रूषामनसूयया ॥ १ ॥
मनुस्मृति अ० १ श्लोक ९१

परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥
श्रीभगवद्गीता अ० १८ श्लोक ४४

याप्रमाणें चतुर्वर्णांचीं कर्तव्यकर्में सांगितलीं आहेत.

आपणांस धर्मसंबंधीं नेहमीं ऐकूं येणाऱ्या अनेक शब्दांमध्यें ' वर्णाश्रमधर्म ' असा एक शब्द आहे. याचा अर्थ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्या व्यवस्थेचे नियम. अनुभव, विचार व कष्ट यांच्या फळाचें नांव नियम- व्यवस्था- होय. प्राचीन शास्त्रकारांनीं आयुष्याच्या कोणकोणत्या भागामध्यें कोणकोणतीं कर्तव्यें करावीं या विषयीं नियम ठरविले आहेत. ह्या व्यवस्थेला 'आश्रम' अशी संज्ञा आहे. आश्रम चार आहेत त्यांचीं नांवें:- ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास. ह्या प्रत्येक आश्रमामध्यें मनुष्याचीं कर्तव्यें कोणतीं या विषयीं मनुस्मृतींत सविस्तर विवेचन केलें आहे. ब्रह्मचर्याश्रमांतील कर्तव्यें पुढें लिहिल्या प्रमाणें आहेतः--

सेवेतेमांस्तु नियमान्ब्रह्मचारी गुरौ वसन् ॥
संन्नियम्येंद्रियग्रामं तपोवृद्ध्यर्थमात्मनः ॥ १ ॥
नित्यं स्नात्वा शुचिः कुर्याद्देवर्षिपितृतर्पणम् ॥
देवताभ्यर्चनं चैव समिदाधानमेव च ॥ २ ॥
वर्जयेन्मधुमांसं च गंधं माल्यं रसान्स्त्रियः ॥
शुक्तानि यानि सर्वाणि प्राणिनां चैव हिंसनम् ॥ ३ ॥
अभ्यंगमंजनं चाक्ष्णोरुपानच्छत्रधारणम् ॥
कामं क्रोधं च लोभं च नर्त्तनं गीतवादनम् ॥ ४ ॥
द्यूतं च जनवादं च परिवादं तथानृतम् ॥
स्त्रीणां च प्रेक्षणालंभमुपघातं परस्य च ॥ ५ ॥

मनुस्मृति अध्याय २ श्लोक १७४—१७९

भावार्थ—नेहमीं गुरुसंनिध रहावें. आपल्या तपोवृद्धीसाठीं इंद्रियगणाचें नियमन करावें. नेहमीं प्रातःस्नान करावें. सदोदित शुचिर्भूत असावें. देव, ऋषि, पितर यांचें तर्पण करावें.

देवपूजा करावी. प्रातःकाळीं व सायंकाळीं समिधांचा होम करावा. गोड गोड पदार्थ खाणें, मांस भक्षण करणें, सुगंधी पुष्पें ग्रहण करणें, स्त्रीप्रेक्षण करणें, प्राणिहिंसा करणें, अभ्यंगस्नान करणें, डोळ्यांत अंजन घालणें, पादत्राण घालणें, छत्रधारण करणें, कामक्रोधादिकांस वश होणें, नृत्य करणें, गाणें, वाजविणें, द्यूत खेळणें, लोकांबरोबर वादविवाद करणें, असत्यभाषण करणें, स्त्रियांकडे कामदृष्टीनें अवलोकन करणें, दुसऱ्यांस पीडा करणें हीं सर्व कर्मैं वर्ज्य करावीं. सारांश, ब्रह्मचर्याश्रमांतील मुख्य कर्तव्य कर्म हें कीं, उत्तम वर्तन ठेवून, गुरुजींची आज्ञा शिरसामान्य करून निरंतर वेदशास्त्राभ्यासामध्यें निमग्न असावयाचें.

प्रकरण २ रें.

ब्रह्मचर्याश्रम.

"प्रथमाश्रमिणः पूर्वं धर्मान्वक्ष्यामि शोभनान् ॥
यान्कृत्वा ब्राह्मणः सम्यक् ब्रह्मलोके महीयते ॥ १॥"

आश्वलायन स्मृति–दुसरा अध्याय.

चार आश्रमांमध्यें ब्रह्मचर्य हा पहिला आश्रम होय. मनुष्याच्या आयुष्यरूपी इमारतीचा पाया ह्याच आश्रमामध्यें रचावयाचा असतो, हें लक्ष्यांत आणिलें असतां ह्या आश्रमाचें महत्व व्यक्त होतें. पाया जसा मजबूद व बळकट असतो तशी पुढील इमारत उभारावयाची असते. यावरून मनुष्याच्या सर्व आयुष्याची इतिकर्तव्यता ज्यावर सर्वस्वीं अवलंबून असते तो ब्रह्मचर्याश्रम किती महत्वाचा आहे, हें निराळें सांगावयास नको.

मनुस्मृति, आश्वलायनस्मृति इत्यादि प्राचीन संस्कृत

ग्रंथांमध्यें ब्रह्मचर्याश्रमाचे कोणकोणते नियम आहेत ह्या विषयीं सविस्तर विवेचन केलें आहे. परंतु, ज्या काळीं ब्रह्मचर्यादि आश्रम प्रचलित झाले तो काळ व सध्यांचा काळ यांमध्यें जमीन–अस्मानाचें अंतर पडल्यामुळें व अलिकडे ' ब्रह्मचर्य ' हा शब्द मुख्यतः ' कर्णज्ञात ' च असल्यामुळें प्रस्तुत आश्रमसंबंधीं प्राचीन नियमांचें उद्‌घाटण करून जागा अडविणें प्रशस्त नाहीं.पूर्वींच्या स्थितींत व हल्लींच्या स्थितींत किती फरक पडत चालला आहे, ह्या विषयीं 'विश्वगुणादर्शात' कृशानूनें ह्मटलें आहेः–

> वेदव्यासः स नवदश यो वेद वेदाक्षराणि
> श्लोकं त्वेकं परिपठति यः स स्वयं जीव एव ॥
> आपस्तंबः स इह कलयेत्सम्यगौपासनं यः
> कष्टं शिष्टक्षतिकृति कलौ कार्श्यमृच्छंति विद्याः ॥१॥

अशा रीतीनें ज्या देशांतील प्राचीन विद्यांचा एकसारखा ऱ्हास होत चालला आहे,त्याची अभ्युन्नति होण्याला मुख्यतः ' अनुकूळ काळ ' च आला पाहिजे असें ह्मणणें भाग येतें ! अस्तु.

ब्रह्मचर्याश्रमासंबंधानें विचार केला तरी पूर्वींच्या स्थितींत हल्लीं विलक्षण फरक पडला आहे, असें स्पष्ट दिसून येतें. पूर्वींच्या विद्यार्थ्यांप्रमाणें हल्लींच्या विद्यार्थ्यांना (ज्यांचा ब्रह्मचर्य हाच आश्रम होय.) दर्भ, पुष्पें, समिधा, दूर्वा आणण्याकरितां अरण्यांत जाण्याचें मुळींच कारण उरलें नाहीं ! ' शाळेंतून सुटल्यावर आह्मीं गुरुजींचें कांहींएक लागत नाहीं ' अशीं मुक्ताफळें आडून छपून पुढें येऊं लागलीं आहेत ! गुरुगृहीं वास करून, काबाडकष्ट करून विद्यार्जन करण्याचें प्रयोजनच उरलें नाहीं ! दर्भासनांना व ' सरस्वतीपीठां ' ना कायमचीच सोडचिठ्ठी मिळाली आहे !

पूर्वीची ' कुलपति ' ही बहुमान्य पदवी अस्तंगत होऊन तिचा अर्थ ' केवळ कुटुंबांतील मुख्य ' असाच करण्याची रूढि पडली आहे ! ' कुलपति ' या पदवीचा वास्तविक अर्थहि पुष्कळांस माहीत नसेल ! ह्या पदवीविषयीं प्राचीन ग्रंथांत ह्मटलें आहेः—

मुनीनां दशसाहस्त्रं अन्नदानादिपोषणात् ॥
अध्यापयति विप्रर्षिरसौ 'कुलपतिः' स्मृतः ॥ १ ॥

एवढी ज्या पदवीची योग्यता, ती पदवी धारण करणारा एकहि विप्रर्षि प्राचीन विद्याकलासंपन्न संपूर्ण भारतवर्षांत सांप्रत असूं नये, ही किती दुःखाची गोष्ट आहे बरें ? पूर्वीच्या ब्रह्मचाऱ्यांचा विद्याभ्यासाचा उद्देश एखादी शुष्क पदवी पटकावून लांगूनचालन करण्याचा–दुसऱ्यांची नौकरी करण्याचा नसून आत्मोन्नतीचा असे. पण आतां परीक्षाजालांतून सुरक्षित उड्डाण केलें कीं पुस्तकांची व पुस्तकांच्या धन्यांची भेट किती दिवसांनीं होते, हें सांगावयास नकोच ! काय हा आमचा जंगी विद्याव्यासंग व ज्ञानार्जनाची कळकळ! दुर्दैव बिचाऱ्या भरतभूमीचें कीं जिला आपल्या ज्ञानशून्य व ' ज्ञानलवदुर्विदग्ध ' मुलांस पाहून क्षणोक्षणीं गहिंवर येत असेल ! ज्ञान हें तर उन्नतीचें मुख्य साधन आहे. त्याचा प्रसार करण्याचें सोडून देऊन उत्कर्षाची हांव धरणें ह्मणजे वाळूवर बांधलेल्या इमारतीच्या सावलींत बसण्याची आशा करण्यासारखें मूर्खपणाचें कृत्य नव्हे काय ? पण लक्ष्यांत कोण घेतो !

हल्लींच्या बऱ्याच विद्यार्थ्यांचा कल कोठें तरी नौकरीधंदा पतकरून पैसे मिळविण्यापलीकडे फारसा नसतो, ही किती दुःखाची गोष्ट आहे ! जणूं काय ' सेवाधर्माचीं कर्तव्यें , बजाविण्यामध्येंच सर्व जन्माची ' इतिकर्तव्यता ' आहे

असें पुष्कळांस वाटतें ! किती शोचनीय स्थिति ही ! प्राचीन विद्यार्थ्यांची व अर्वाचीन विद्यार्थ्यांची तुलना करितांना आणखी दोन गोष्टी लक्ष्यांत ठेवण्यासारख्या आहेत. एक विवाहरूढी व दुसरी कुटुंबभरण. पूर्वीं ब्रह्मचर्यकाल समाप्त झाल्यावर विवाह होत असे, पण आतां त्यास कांहींच मर्यादा नाहीं ! पूर्वींच्या विद्यार्थ्यास कुटुंबभरणाची विशेष काळजी करण्याचें कारण नसे, पण आतां पहाल तर विपरीत स्थिति ! कित्येक विद्यार्थ्यांस, त्यांच्या दुर्दैवामुळें ह्मणा किंवा हल्लींच्या विलक्षण परिस्थितिप्रभावामुळें ह्मणा, फारच लौकर संसारभार डोक्यावर घेऊन संकटशत्रूंशीं टक्कर मारण्याची पाळी येते, व बिचाऱ्यांना विपत्तींच्या तडाक्यांतून सुटतां सुटतां 'दे माय धरणी ठाय' होऊन आपल्या आयुष्याच्या ऐन भराचे दिवस दुःखांत व चिंतेंत काढावे लागतात ! यावरून, अर्वाचीन विद्यार्थ्यांची काय 'दशा' झाली आहे, हें कोणाहि सहृदय मनुष्याला सहज कळण्यासारखें आहे. अर्वाचीन विद्यार्थ्यांच्या ह्या कष्टमय अवस्थेचा विचार केला असतां कोणाचेंहि अंतःकरण एकसमयावच्छेदेंकरून सहानुभूति व गहिंवर यांनीं सद्गदित झाल्यावांचून राहणार नाहीं ! ! !

वरील विवेचनावरून ज्या ब्रह्मचर्याश्रमाचें पूर्वीं एकाकाळीं अतिशय महत्व होतें, किंबहुना ज्यावर भावी उन्नति अवलंबून असे, तो ब्रह्मचर्याश्रम या आपल्या प्राचीन विद्याविख्यात भरतभूमींत 'नामशेष' होण्याची पाळी यावी, हें केवढें दुर्दैव होय ! परंतु, ह्या बद्दल आतां वाईट वाटण्यांत विशेष अर्थ नाहीं. कारण असा सृष्टीचा नियमच आहे कीं,

"कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा ॥
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ! ॥ १ ॥"

कालिदास—मेघदूत.

तथापि, गतगोष्टींबद्दल शोक करित न बसतां 'स्वावलंबना' नें आत्मोन्नतिप्रीत्यर्थ निरंतर प्रयत्न करणें हें विचारी पुरुषाचें लक्षण आहे. यासाठीं, आपल्या हल्लींच्या स्थितींत आपणास काय करितां येण्यासारखें आहे व कशा रीतीनें प्रयत्न केले ह्मणजे आपणास पूर्ववैभव संपादन करितां येईल याचें नेहमीं मनन करणें उचित आहे.

विद्याप्राप्तीच्या प्राचीन व अर्वाचीन मार्गांमध्येंहि पुष्कळच फरक पडला आहे. अलीकडच्या सुधारलेल्या लोकांना विद्यादेवीच्या दर्शनाचा प्राचीन मार्ग बराच बिकट वाटून त्यांनीं दुसरा मार्ग स्वीकारिला आहे! विद्यादेवीचें दर्शन करून देणारे तीन मार्ग आहेत, ते हेः—

गुरुशुश्रूषया विद्या पुष्कलेन धनेन वा ॥
अथवा विद्यया विद्या चतुर्थी नोपपद्यते ॥ १ ॥

ह्यांपैकीं पूर्वी पहिली पद्धति प्रचारांत असे. पण 'नवं नवं प्रीतिमहो करोति' ह्या न्यायानें लोकांचा कल नवीन मार्गाकडे झाला असें ह्मणा किंवा त्यांना दुसऱ्या मार्गानेंच जाणें भाग पडल्यामुळें ह्मणा तात्पर्य एकच! सारांश, हा दुसरा मार्ग 'पुष्कळसें द्रव्य खर्च करून विद्या शिकणें' होय.

ब्रह्मचर्याश्रमांतील मुख्य कर्तव्य 'विद्यासंपादन' हें होय. विद्यासंपादनार्थ जो प्रयत्न करितो तो 'विद्यार्थी' होय. विद्यार्थी ह्या शब्दाची व्युत्पत्ति व अर्थ लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. विद्यार्थी ह्या शब्दामध्यें विद्या+अर्थी असे दोन मुख्य अवयव आहेत. विद्या ह्या अवयवामध्यें 'विद् जाणणें' असा धातु असून 'या' प्रत्यय आहे. 'अर्थी' ह्या अवयवामध्यें 'अर्थ—मागणें' असा धातु असून शेवटीं ती क्रिया करणारा अशा अर्थी 'इन्' प्रत्यय आहे. व्युत्पत्तीवरून विद्यार्थी या शब्दाचा स्पष्टा-

र्थ 'विद्या मागणारा' किंवा 'विद्या हेंच आहे अर्थ–धन–ज्याचें तो' असा आहे. तात्पर्य, 'विद्यासंपादनतत्पर असणें' हें विद्यार्थ्याचें मुख्य लक्षण आहे.

वरील लेखावरून पूर्वींच्या 'ब्रह्मचर्याश्रमा' चें हल्लींच्या 'विद्यार्थी अवस्थे' मध्यें कसें 'संक्रमण' झालें आहे, हें कोणासहि सहज कळून येण्यासारखें आहे. दंड, कमंडलू, मेखला, मृगाजिन धारण करणारे 'ब्रह्मचारी' आपल्या समाजांत 'कांहीं काळ' पावेतों असतात, पण एकंदरीनें अंतर्बाह्य स्वरूपाचा लोप झाला आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं!

प्रकरण ३ रें.

विद्यार्थ्यांचीं कर्तव्यें.

"सुखार्थाः सर्वभूतानामतः सर्वाः प्रवृत्तयः ॥
सुखं च न विना धर्मात्तस्माद्धर्मपरो भवेत् ॥ १ ॥ "

वाग्भट.

विद्यार्थी मित्रहो, वरील सर्व विवेचनावरून हल्लीं आपण कोणत्या परिस्थितींत आहोंत ह्याची कल्पना सहज झाली असेलच. आपलीं कर्तव्यें काय आहेत ह्यांचें उत्तम ज्ञान करून घ्या. निराश होऊं नका. धैर्य सोडूं नका. परमेश्वरानें आपणास वेळोवेळीं अभिवचनें दिलीं आहेत. तीं, वेळ काढून नेण्यापुरतींच नसून सत्यानें परिपूर्ण भरलेलीं आहेत! "अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्" "ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्" हीं भगवान् श्रीकृष्णाचीं वाक्यें मोठ्या अक्षरांनीं प्रत्येकानें आपल्या घरीं उत्तमजागीं लिहून ठेवण्या सारखीं

आहेत ! ज्या परमेश्वरानें आपणास जन्म दिला आहे त्याला आपली काळजी आहेच आहे. तो सर्वांचा संरक्षक आहे. त्याला अनन्यभावानें जे शरण जातात त्यांचें नेहमीं कल्याणच व्हावयाचें. आपण जर सत्यमार्गाचें उल्लंघन केलें नाहीं तर आपलें अहित कधींहि व्हावयाचें नाहीं. यासाठीं, आपल्या परिस्थितीचा व कर्तव्यांचा नीट विचार करा. परमेश्वराला शरण जा ह्मणजे तो आपला खचित उद्धार करील.

आपलें कर्तव्य यथायोग्यरीतीनें बजाविण्यामध्येंच आपलें खरें कल्याण असतें, ह्या विषयीं प्रसिद्ध वाग्भट्टाचार्यांचा अष्टांगहृदयांतील श्लोक आरंभीं दिला आहे. त्याचा भावार्थः— सर्वप्राण्यांची इच्छा आपणास सुख प्राप्त व्हावें अशी असते आणि सुखासाठींच जगांतील सर्व व्यवहार चाललेले असतात. परंतु खरें सुख धर्माचरणावांचून प्राप्त होत नाहीं, ह्मणून सर्वांनीं आपापल्या धर्माकडे-कर्तव्यकर्मांकडे-पूर्ण लक्ष्य देऊन वागावें.

चार आश्रमांमध्यें ' ब्रह्मचर्य ' हा पहिला आश्रम आहे. आपण ब्रह्मचर्याश्रमामध्यें जी विद्या संपादन करूं तिचा उपयोग पुढें व्हावयाचा आहे. विद्यार्थीअवस्थेंतील कर्तव्यें फार महत्वाचीं आहेत. कारण, मनुष्याच्या भावी उन्नतीचा प्रारंभ ह्याच अवस्थेंत होतो. यासाठीं, आपण आतां विद्यार्थ्यांच्या कर्तव्यांचा सविस्तरपणें विचार करणें प्रशस्त दिसतें.

(१) विद्यासंपादन—विद्यासंपादनार्थ होईल तितका प्रयत्न करणें हें विद्यार्थ्यांचें पहिलें कर्तव्य आहे. विद्यासंपादनावरून हल्लींच्या ब्रह्मचर्याश्रमाला ' विद्यार्थी आश्रम' असेंहि नांव देतां येईल! विद्यानंदापुढें इतर आनंद तुच्छ होत. 'तत्वज्ञानान्मोक्षः' 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' 'बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ' इत्यादि अनेक वाक्यांवरून विद्यानंदाची श्रेष्ठता

व्यक्त होते. विद्या ह्मणजेच आत्मज्ञान. आत्मज्ञानाचा विचार मुळींच न करितां गृहसुतधनदारासक्त होणें हें पशुतुल्य वर्तन असून मनुष्यत्वाला काळिमा आणणारें आहे! ज्ञानहीन मनुष्य व पशु ह्यां मध्यें फरक तो काय! ज्ञानरहित मनुष्य खरोखर पुच्छविषाणहीन पशूच होय! मनुष्यजन्मास येऊन ज्ञानसंपादनाविषयीं उदासीन राहणें या सारखी शरमेची व मनुष्यतेस बट्टा आणणारी गोष्ट कोणतीच नसेल! वारंवार जन्मास येऊन व क्षणभंगुर सुखाचा उपभोग घेऊन जन्ममरणचक्रांत भ्रमण करीत असणें अत्यंत लांछनास्पद आहे. 'बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते' ह्या भगवद्वचनावर पूर्ण निष्ठा ठेवून आत्मोन्नति करणें हें मनुष्याचें आद्यकर्तव्य आहे. आपली उन्नति व्हावी अशी उत्कट इच्छा असेल (इच्छा असणें हेंच मनुष्यत्वाचें लक्षण आहे) तर निरंतर ज्ञानसंपादन करा. विद्याभ्यासाच्या योगानें आज नाहीं उद्यां, ह्या जन्मीं नाहीं पुढल्या जन्मीं, आपल्या आत्म्याचा उद्धार होईलच होईल. परमेश्वरानें मला राजा केलें नाहीं असें ह्मणून दुःख करीत न बसतां आपण उच्चपदप्राप्त्यर्थ निरंतर प्रयत्न करावे. मनुष्यानें प्रयत्न केले तर ' नराचा नारायण ' होतो. सारांश, आत्मोन्नति करणें हें मनुष्याचें मुख्य कर्तव्यकर्म आहे, व हें कर्तव्य उत्तम रीतीनें बजाविलें जावें अशी ज्याची उत्कट इच्छा असेल त्यानें विद्यार्थी अवस्थेमध्यें निरंतर ज्ञानसंपादन करावें.

प्रिय विद्यार्थी जनहो, आपल्या इच्छेविरुद्धहि वडील मनुष्यांकडून ' श्रीगणेशा ' चा धडा गिरविण्याची बाळपणीं सक्ति करण्यांत येते तिचा उद्देश आतां तुह्मांला कळलाच असेल. बाल्यावस्थेंत जर ज्ञानाचा ' ॐनामा ' झाला नाहीं तर पुढें तारुण्यावस्थेंत तर सिद्ध काय होणार! मग तर मुळींच बोलावयास नको! मग पश्चात्ताप करण्याशिवाय कांहीं

हातांत राहत नाहीं ! मागाहून पश्चात्ताप होऊन त्याचा काय उपयोग ! पुढें पश्चात्ताप करण्याचा प्रसंग न यावा असें जर तुह्मांस वाटत असेल तर, विद्यार्थ्यांचें मुख्य कर्तव्य जें विद्यासंपादन त्याकडे बिलकूल दुर्लक्ष करूं नका ! ‘ बाळपणीं विद्यावृक्षासी लावावें । तरुणपणीं घ्यावें फळ त्याचें ’ ह्या कवितेचें रहस्य आतां तुह्मांला सांगावयास नकोच. ‘ विद्यार्थी नित्यमुक्त असतो ’ हें अध्यात्मरामायणांतील वाक्य नेहमीं लक्षांत ठेवा. क्षणिक सुखापेक्षां शाश्वत सुखाची योग्यता ज्यास्त आहे, हें स्मरणांत असूंद्या. घरदार, जमीनजुमला, पैसारुका, गाड्याघोडीं ह्यांपासून जो आनंद होतो तो क्षणिक असतो. या आनंदाला भुलून आपल्या जीवितसर्वस्वाची हानि करूं नका. एका संस्कृत ग्रंथकारानें ह्मटलें आहेः—

आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् ॥
धर्मो हि तेषामधिको विशेषो धर्मेण हीनाः पशुभिः सामानाः॥

याचा अर्थ उघडच आहे. मनुष्यानें धर्मनिष्ठ असलें पाहिजे. धर्म ह्मणजे कर्तव्यकर्म. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत. आपल्या कर्तव्यांकडे दुर्लक्ष करून जो मनुष्य ह्या चतुर्विध पुरुषार्थांपैकीं एकहि प्राप्त करून घेत नाहीं, त्याचा जन्म अजागलस्तनाप्रमाणें निरर्थक होय, असेंही एका कवीनें ह्मटलें आहे. यासाठीं, विद्यार्थी जनहो, आपल्या कर्तव्यांचें उल्लंघन करण्याचें पातक कधींहि करूं नका.

विद्या शिकण्याचा मुख्य उद्देश पोट भरणें हा नव्हे. ज्या वेळीं परमेश्वरानें प्राण्याला जन्मास घातलें, तेव्हांच त्यानें त्याच्या पोटापाण्याची सोय करून ठेविली आहे. आळसानें किंवा अज्ञानानें जर पोट भरण्यापलीकडे कांहींच केलें नाहीं तर परमेश्वराच्या दृष्टीनें आपण दोषी ठरूं. कारण, त्यानें

'विशिष्ट बुद्धि' ही सर्वोत्कृष्ट देणगी आपणास दिली आहे तिचा योग्य कामाकडे उपयोग केला नाहीं तर ती निरुपयोगी होऊन आपण ईश्वराचा अपमान केल्यासारखें होईल. पशूंप्रमाणें 'भरल्या पोटा जारे दिवसा' अशी वर्तणूक तर मनुष्याला न शोभण्यासारखी आहे. एका इंग्लिश ग्रंथकारानें ह्मणलें आहे कीं, "परमेश्वरानें मनुष्याला क्षुल्लक कामांकरितां उत्पन्न केलें नसून त्याच्या हातून मोठमोठीं कृत्यें घडावीं असा त्याचा संकेत दिसतो !" खरें आहे. अत्यंत दुर्मीळ अशा मनुष्यजन्मास येऊन जन्मसाफल्य न करण्याचें वेडेपणाचें कृत्य न व्हावें अशी ज्यांची अंतःकरणपूर्वक इच्छा असेल, त्यांनीं अहर्निश ज्ञानसंपादन करावें. मनुष्यजन्म किती दुर्मीळ आहे ह्या विषयीं महाभारतान्तर्गत भीष्मनीतींत एके ठिकाणीं ह्मटलें आहेः—

सुलभं पातकं लोके दुर्लभः पुण्यसंग्रहः ॥
सुदुर्लभमिदं जन्म मानुषं भरतर्षभ ! ॥ १ ॥

ही मनुष्यजन्माची दुर्मीलता जाणूनच एका ग्रंथकारानें ह्मटलें आहेः—

महता पुण्यपण्येन क्रीतेयं कायनौस्त्वया ॥
पारं दुःखोदधेर्गन्तुं तर यावन्न भिद्यते ॥ १ ॥

याचा अर्थ उघडच आहे. यासाठीं, दुर्मीळ अशा मनुष्यजन्माचें सार्थक करण्याचा प्रत्येकानें प्रयत्न करावा. ज्याला आपल्या जन्माचें योग्य साफल्य व्हावें असें वाटत असेल त्यानें निरंतर ज्ञानसंपादन करावें हें उचित होय.

जगामध्यें ज्ञान ही एक मोठी अद्भुत शक्ति आहे. ज्ञानरूपी शक्तीनें ह्या भूमंडलावर अनेक चमत्कार होऊन गेले आहेत, सांप्रत होत आहेत व भविष्यकाळीं कोणकोणते चमत्कार दृग्गोचर होणार आहेत, ह्या विषयीं मानवी कल्पना कुंठित

होते ! अलीकडच्या सुधारलेल्या काळांत ज्ञानसंपन्न राष्ट्राचें किंवा मनुष्याचें वर्चस्व अज्ञानी राष्ट्रावर किंवा मनुष्यावर प्रस्थापित होण्यास विशेष कालावधि अथवा परिश्रम लागत नाहींत, हें सर्वांस कळून चुकलेंच आहे. यक्षिणीच्या कांडी प्रमाणेंच कीं काय या ज्ञानरूपी शक्तीच्या साह्यानें, दक्षिण आफ्रिकेंतील शिद्दी लोकां सारख्या रानटी लोकांनीं व्याप्त अशा कित्येक देशांनीं अतुल संपन्नतेविषयीं अनेक भूप्रदेशांस खालीं मान घालावयास लाविलें आहे, व ज्ञानशक्तीच्या योगानें नवीन महाद्वीपांतील भूप्रदेशांचें जणूं काय पुनरुज्जीवन होऊन त्यांच्या परम सामर्थ्याविषयीं सर्व राष्ट्रांस धाक वाटत आहे ! तसेंच, आशिया खंडाच्या नकाशांत एका कोंपऱ्यांत दृश्यमान होणाऱ्या अनतिविस्तीर्ण द्वीपसमूहाचें गूढ सामर्थ्य एकाएकीं सर्व जगाच्या निदर्शनास आणून 'ज्ञानशक्ती'-नें आपल्या सर्व श्रेष्ठतेचें साक्षात् प्रकटीकरण केलें आहे असा भास होतो ! एकटचा ज्ञानशक्तीच्या साह्यानें लक्षावधि किंबहुना कोटचवधि मनुष्यांस दासानुदास बनवितां येतें हेंचसें काय, पण जगदुत्पत्तीला कारणीभूत अशा पंचमहाभूतांसहि ज्ञानशक्तीपुढें लीन होऊन तिची आज्ञा निमुटपणें मान्य करणें भाग पडत आहे ! हल्लींचा काळ झोटिंग बादशाहीचा नसून ज्ञानसंपन्नतेचा आहे. मनगटाच्या जोरावर मुलुख पादाक्रांत करण्याचे दिवस आतां राहिले नाहींत ! ज्ञान हीच शक्ति आहे (Knowledge is power) अशा अर्थाची इंग्लिश भाषेंतील म्हण सर्वप्रसिद्धच आहे. ज्या देशांत ज्ञानाचा प्रसार झपाटयानें होत असतो, तो देश उत्तरोत्तर उन्नतीचा मार्ग क्रमण करीत असतो, असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

ज्ञान दोन प्रकारचें आहे. एक ऐहिक ज्ञान व दुसरा

प्रकार पारमार्थिक ज्ञान. ऐहिक ज्ञान ह्मणजे जगांतील भिन्न भिन्न वस्तूंच्या गुणदोषांची माहिती. पारमार्थिक ज्ञान ह्मणजे या अमर्याद जगांतील अनंत वस्तु कोणी, कशा निर्माण केल्या, त्यांचा चालक, संरक्षक व नाशक कोण, मी कोण, आलों कोठून, जाणार कोठें इत्यादि अनेक गोष्टींबद्दल जे निरनिराळे विचारतरंग मनोरूप सरोवरामध्यें उद्भवतात, व ब्रह्मविद्यामृतवर्षावानें शांत व संतुष्ट होतात तें ज्ञान. प्रथम, ऐहिक ज्ञान संपादन करून नंतर क्रमाक्रमानें पारमार्थिकज्ञानप्राप्तीचा प्रयत्न करणें श्रेयस्कर आहे. ऐहिक ज्ञान प्राप्त झाल्याशिवाय पारमार्थिक ज्ञान संपादन करितां येणार नाहीं. ऐहिक ज्ञानही परमात्मप्राप्तीची पहिली पायरी आहे, व याच पायरीच्या आश्रयानें पुढील मार्गक्रमण करावयाचें आहे. उपजतांच परमार्थज्ञानाधिकारी झाले ते केवळ ईश्वरी अंशच होत, श्रीशुकाचार्य, शंकराचार्यादि जगद्गुरु हे केवळ भगवंताचे अवतार होत. ज्या प्रमाणें 'प्रथम प्रपंच साधून मग परमार्थाचा लाभ करण्यामध्यें भलेपण असतें' असें तुकाराम सांगतात, त्याप्रमाणेंच प्रथम ऐहिक ज्ञान संपादून नंतर पारमार्थिक ज्ञानाकडे मोर्चा फिरविणें इष्ट असतें.

ऐहिक व पारमार्थिक ज्ञानामध्यें पूर्वी एके काळीं आपल्या पूर्वजांनीं अत्यंत प्रावीण्य मिळविलें होतें, हें अनेक आधारांवरून सिद्धच आहे. पण या संबंधानें आपण आर्यनामधारी लोक केवळ अभिमानवाहक बनलों आहोंत, हें लांछनास्पद नाहीं काय ? व्यास, पाणिनी, गर्ग, आत्रेयादि प्राचीन मुनिवर्यांस, आपणा ज्ञानबलहीन वंशजांस अवलोकन करून क्षणोक्षणीं किती सखेदाश्चर्य वाटत असेल, याचा आपण कधीं विचार केला आहे काय? शिव शिव ! गेला तो काल आणि तें ब्राह्मणांचें अग्नितुल्य तेज ! तें क्षत्रि-

यांचें बाहुसामर्थ्य आज कोठें तरी दृष्टोत्पत्तीस येत आहे काय? ' शापादपि शरादपि ' हा ब्राह्मणांचा पूर्वप्रभाव बहुतेक अस्तंगत होऊन अज्ञानभ्रम-पटलानें एकसमयावच्छेदेंकरून अनादि सिद्ध धर्म व प्राचीन विद्या लुप्तप्राय करून सोडिल्या आहेत ! सारांश, प्राचीन आर्य लोकांच्या वैभवसंपन्न राष्ट्रामध्यें ज्ञानसूर्य बहुतेक अस्तंगत होऊन, पाश्चात्य राष्ट्रांमध्यें तो उदय पावून त्याचे प्रकाशकिरण दुसऱ्याहि कित्येक भाग्यशाली राष्ट्रांमध्यें पडून तिकडे त्यांची उत्तरोत्तर अभिवृद्धि होत आहे; पण ह्या गतवैभवी हिंदुस्थानदेशास दुर्दैवरूपी राहूनें ग्रासल्यामुळें ह्मणा, किंवा अन्य कांहीं कारणानें ज्ञानसूर्याचा विपुल प्रकाश मिळत नाहीं, तेणेंकरून चोहोंकडे अज्ञानांधःकार वाढत चालला आहे, हें ज्याची दृष्टि धनमदानें व विवेकशून्यतेनें कलुषित झाली नाहीं, अशा कोणाहि मनुष्यास निःसंशय वाटल्यावांचून राहणार नाहीं ! ! !

प्रिय विद्यार्थी जनहो, वरील विवेचनावरून विद्यार्थी अवस्थेमध्यें विद्या संपादन करणें किती अगत्याचें आहे, हें आपणास कळून आलेंच असेल. देशाच्या भावी उन्नतीचे आपणास आधारस्तंभ व्हावयाचें आहे हें लक्ष्यांत ठेवा. कोणत्याहि राष्ट्राचा उत्कर्षापकर्ष त्यांतील शिक्षणावर बहुतांशीं अवलंबून असतो. अर्थात् राष्ट्राच्या भावी हिताहिताचा संबंध त्यांतील तरुण विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वशक्तीशींच मुख्यतः असतो. अशा दृष्टीनें पाहिलें असतां आपणावर शिक्षणाची केवढी मोठी जबाबदारी आहे, हें आपल्या सहज लक्ष्यांत येईल. राष्ट्रोन्नतीचें सुकाणूं पुढें विद्यार्थी वर्गालाच हातीं धरावयाचें असतें. या संसारसागरांत कधीं कधीं संकटरूपी खडकांवर आपली जीवननौका आपटण्याचा फार संभव असतो. आ-

पली जीवयात्रा सुरक्षितपणें होण्यास विद्यादेवीची निरंतर आराधाना करणें श्रेयस्कर आहे. आपली ऐहिक व पारलौकिक अभ्युन्नति होण्यास विद्यादेवीची निस्सीम सेवा हेंच एक साधन आहे. ऐहिक वस्तूंच्या उपभोगानें क्षणभंगुर सौख्य प्राप्त होतें, पण शाश्वत सुखाचा लाभ केवळ ज्ञानार्जनामध्येंच होतो. यासाठीं, प्रत्येक विद्यार्थ्यानें निरंतर ' विद्यासंपादन ' करावें म्हणजे त्यानें आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजाविलें असें होईल, इतकेंच नव्हे तर, ईश्वरकृपेनें त्याचे मनोरथ परिपूर्ण होतील.

(२) कोणत्या तरी एका कलेचें विशेष ज्ञान संपादणें—कोणती तरी एक कला साध्य करून घेणें–हें विद्यार्थ्यांचें दुसरें कर्तव्य आहे. पहिल्या कर्तव्यासंबंधानें विद्यार्थ्यांचा समाजाशीं संबंध नसतो, त्यांनीं फक्त विद्यार्जनच करावयाचें असतें. परंतु आतां सांगितलेल्या दुसऱ्या कर्तव्यासंबंधानें विद्यार्थ्यांचा समाजाशीं अत्यंत निकट संबंध असतो; यासाठीं, प्रस्तुत विषयाचें जरा सविस्तर विवेचन करणें अवश्य आहे.

जगामध्यें पैसा ही एक अद्भुत वस्तु आहे. मनुष्य द्रव्यवान असला आणि त्याच्या अंगीं वास्तविक योग्यता नसली तरी लोक त्याला मान देतात, त्याच्या गुणांचे गोडवे गातात, फार तर काय, त्याची थुंकी झेलण्यास एका पायावर तयार असतात! एक संस्कृत कवि ह्मणतोः–

यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः स पण्डितः स श्रुतिमान् गुणज्ञः॥
स एव वक्ता स च दर्शनीयः सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते॥१॥

याचा अर्थ, ज्याच्या जवळ बरेंचसें द्रव्य आहे, तोच मनुष्य कुलीन, विद्वान्, वेदवेत्ता, सद्गुणी, वक्ता, वंदनीय

होय ! कारण, सर्व गुण सुवर्णाच्या सांनिध्यावर अवलंबून असतात, ह्मणजे, जेथें विपुल द्रव्य असतें, तेथें सर्व सद्गुण मूर्तिमंत वास करीत असतात ! याचा अनुभव बहुधा सर्वांस असेलच. याच्या उलट उदाहरणेंहि थोडीं थोडकीं असतात असें नाहीं. एखादा मनुष्य कितीहि विद्वान्, कितीहि विचारी कसाहि सद्गुणी व केवढाहि तत्त्ववेत्ता असला, आणि लक्ष्मीची जर कां त्याच्यावर वक्रदृष्टि असली तर त्याची अवहेलना व धिःकार बऱ्याच ठिकाणीं झाल्यावांचून राहत नाहीं एका अर्वाचीन कवीनें ह्मटलें आहेः–

देखों असें सतत कीं विबुधांस लोकीं ॥
लक्ष्मी प्रसन्न नयनें न कधीं विलोकी ॥

यावरून लक्ष्मीचें व सरस्वतीचें किती सख्य आहे हें सांगावयास नकोच. फार झालें तर द्रव्यहीन विद्वान् मनुष्य आपलें पारमार्थिक हित करूं शकेल पण ऐहिक सौख्याचा त्याला लेशहि प्राप्त होणार नाहीं ! त्याच्या मनांतील उद्देश कितीहि उच्च असोत, त्याच्या विचारांची धांव कितीहि जलद असो, द्रव्याचें पाठबळ नसलें तर त्याचे बेत कधींहि सफल व्हावयाचे नाहींत. एका संस्कृत ग्रंथकारानें ह्मटलें आहेः–

उत्पद्यंते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः ॥

अर्थात्, द्रव्यहीन लोकांचे बेत मनांतल्या मनांत राहतात ! परंतु ‘ द्रव्येण सर्वे वशाः ’ या न्यायानें धनवान् मनुष्य पाहिजे तें करूं शकतो, हें उघड आहे.

जगामध्यें द्रव्याची अतिशय आवश्यकता आहे. द्रव्यावांचून जगांतील अनेक भिन्न भिन्न व्यवहार चालावयाचे नाहींत. कोणत्याहि कृत्याची सिद्धि मुख्यत्वेंकरून द्रव्यावर अवलंबून असते, यासाठीं, नेहमीं द्रव्यसंपादनार्थ प्रयत्न

करणें किती अवश्य व इष्ट आहे, हें उघडच आहे. न्यायानें द्रव्य संपादन करण्यांत मुळींच पाप नाहीं. एका ग्रंथकारानें ह्मटलें आहे:–

अकृत्वा परसंतापं अकृत्वा खलनम्रताम् ॥
अनुसृत्य सतां वर्त्म यत्स्वल्पमपि तद्बहु ॥ १ ॥

याचा अर्थ, इतर लोकांस पीडा न देतां व नीच लोकांशीं हांजीहांजी न करितां सज्जनांच्या वर्तनास अनुसरून जें थोडेंबहुत द्रव्य मिळेल त्यांत आनंद मानून रहावें. मनुस्मृतींतहि द्रव्य संपादन करण्याविषयीं ह्मटलें आहे:–

नात्मानमवमन्येत पूर्वाभिरसमृद्धिभिः ॥
आमृत्योः श्रियमन्विच्छेन्नैनां मन्येत दुर्लभाम् ॥१॥

सारांश, आपणाजवळ द्रव्य नाहीं ह्मणून उदासीन राहूं नये. मरण येईपर्यंत संपत्ति मिळविण्याचे प्रयत्न करावे. गुणी मनुष्याला संपत्ति मुळींच दुर्लभ नाहीं. सुप्रसिद्ध भारवी कवीनेंहि असेंच ह्मटलें आहे:–

" वृणतेहि विमृश्यकारिणं गुणलुब्धाः स्वयमेव संपदः ॥१॥ "

याचा भावार्थ, गुणी मनुष्याला संपत्ति आपण होऊनच वरितात ! यावरून, द्रव्यप्राप्त्यर्थ निरंतर प्रयत्न करणें किती अवश्य व श्रेयस्कर आहे, हें अगदीं उघडच आहे.

श्रीजगद्गुरु शंकराचार्यप्रभृति महान् महान् तत्ववेत्त्यांनीं व साधुजनांनीं द्रव्याचा निषेध केला आहे. द्रव्य पापाला कारणीभूत होत असतें. ह्मणून द्रव्यासक्त न होण्याविषयीं मोठ्या कळकळीनें उपदेश केला आहे. आचार्य ह्मणतात:–

"मूढ जहीहि धनागमतृष्णां कुरु तनुबुद्धे मनसि वितृष्णाम्॥
यल्लभसे निजकर्मोपात्तं वित्तं तेन विनोदय चित्तम् ॥
अर्थमनर्थं भावय नित्यं नास्ति ततः सुखलेशः सत्यम् ॥
पुत्रादपि धनभाजां भीतिः सर्वत्रैषा कथिता नीतिः ॥ "

चर्पटपंजरी.

हा उपदेश अक्षरशः खरा आहे, इतकेंच नव्हे तर, सर्वांनीं तो नेहमीं लक्ष्यांत ठेवण्या सारखा आहे. तसेंच, हा उपदेश, प्रपंचांत पडलेल्या मनुष्यांनीं सर्वकाळ द्रव्यार्जनांतच घालवून आपल्या अधिक महत्वाच्या कर्तव्यांकडे दुर्लक्ष्य करूं नये, हें सुचविण्या करितांच केलेला असावा, असें मानणें सयुक्तिक आहे. कारण एरवीं '**यल्लभसे निजकर्मोपात्तं वित्तं तेन विनोदय चित्तम्**' असें आचार्यांनीं ह्मटलें नसतें. त्यांनीं द्रव्याचा सर्वस्वीं निषेध केला नाहीं. त्यांच्या सांगण्याचा भावार्थ असाच आहे कीं, रात्रंदिवस द्रव्याच्याच मागें लागणें इष्ट नाहीं. आणखी, दुसरी एक गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, मनुष्यानें अतिशय द्रव्य संपादन करून त्याचा व्यय परोपकाराकडे करावा. परोपकारासारखें पुण्य नाहीं. या साठीं, द्रव्याचा व्यय सत्कर्मीं करणें योग्य आहे. देशांतील हजारों दुष्काळग्रस्त लोकांस मदत केल्याचें श्रेय थोडें आहे काय? हजारों किंबहुना लक्षावधि गाईचें संरक्षण केल्याचें पुण्य अल्प आहे काय? नाहीं. अशा रीतीनें परोपकार करण्याकडे वित्तव्यय केला असतां ऐहिकदृष्ट्या व पारमार्थिक दृष्ट्या तो किति श्रेयस्कर आहे बरें! तात्पर्य, मनुष्यानें योग्य रीतीनें पैसा मिळवावा व योग्य रीतीनें त्याचा खर्च करावा.

जगांत असा एक नियम दिसतो कीं, जसजशी परिस्थिति बदलते, तसतशी मनुष्याला आपल्या कर्तव्याची दिशा पालटावी लागते. श्रीमज्जगद्गुरूंनीं व तुकाराम रामदासप्रभृति साधुवर्यांनीं ज्या कालामध्यें द्रव्याची अनवश्यकता दर्शवून धनासक्त न होण्याचा उपदेश केला आहे, त्या काळांत व हल्लींच्या काळांत जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे. आजपर्यंत आपल्या देशांत प्लेग व दुष्काळ यांनीं लाखों लोकांस यमसदनाचो वाट दाखविली आहे; दररोज दोन

प्रहरीं टींचभर पोटाची खळी भरण्याकरितां स्वदेश सोडून हजारों लोकांना परदेशांत भयंकर विपत्तींमध्यें दिवस काढावे लागत आहेत; दरवर्षी हजारों गोमातांना मुक्ति प्राप्त होत आहे; अशा स्थितीमध्यें सर्वसंग परित्याग करून 'हरि हरि' ह्मणत बसल्यानें आपलें प्राचीनवैभवसंपन्न राष्ट्र सुधारेल काय? अथवा अशा कडकडीत वैराग्यानें आपली भावी उन्नति कधींतरी होईल काय? द्रव्यावांचून गोमातांचा छल व परधर्माचे आघात बंद होतील काय? नाहीं नाहीं! हल्लींची परिस्थिति फार वेगळी आहे. ऐहिक उन्नति झाल्याशिवाय पारमार्थिक प्रगति कधींहि व्हावयाची नाहीं! दोनप्रहरच्या वेळीं मनुष्य क्षुधाक्रान्त झाला ह्मणजे त्याची कशी स्थिति होते ह्याची कल्पना करणें अवघड आहे असें नाहीं. 'आधीं पोटोबा मग विठोबा' ही ह्मण अगदीं खरी आहे! मग ज्यांच्या घरीं चार मुलांमाणसांचा परिवार आहे, परंतु ज्यांच्या घरीं अठरा विस्वे दारिद्र्यानें आपला पगडा बसविला आहे, त्यांनीं द्रव्यप्राप्तीचा मुळींच प्रयत्न न करितां आळसामध्यें किंबहुना सर्वसंगपरित्याग करून ईश्वरभजनामध्यें आपला सर्वकाळ घालवावा काय? ह्याचा विचार सुज्ञांनींच करावा. हल्लींची परिस्थिति अगदीं भिन्न असल्यामुळें मनुष्यानें द्रव्यसंपादनासाठीं शक्य ते प्रयत्न केलेच पाहिजेत. द्रव्य मिळविलें नाहीं तर आपला व आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालावा कसा? व इहलोकची संसारयात्रा व्हावी कशी? चतुर्विध पुरुषार्थांमध्यें 'अर्था' ची गणना केलेलीच आहे. तेव्हां, प्रत्येकानें स्वशक्त्यनुसार द्रव्य संपादन करणें अवश्य आहे. हें उघड आहे.

प्रिय विद्यार्थी-जन हो, आपल्या देशाची हल्लीं काय स्थिति आहे, आपण कोणत्या वातावरणांत आहों, हें आपण

जाणतच आहां. प्रस्तुत स्थितीवरून भावी उत्कर्षाविषयीं निराश होऊं नका. उद्योग करून आपल्या कर्तृत्वशक्तीचा योग्य उपयोग करा. आपल्या कर्तृत्वशक्तीचा योग्य उपयोग व्हावा, अशी ज्यांची मनापासून इच्छा असेल त्यांनीं उद्योगाची बळकट कांस धरावी. उद्योगानें मनुष्य पाहिजे तें करूं शकेल. उद्योगाला कोणतीहि गोष्ट अशक्य नाहीं. उद्योगानें रंकाचे राव होतात व निरुद्योगानें रावाचे रंक होतात! आपल्या राज्यकर्त्यांनीं साम्राज्यरूपी इमारत उद्योगाच्याच दृढ पायावर उभारली आहे, हें लक्ष्यांत ठेवणें अवश्य आहे! या एका उदाहरणावरून उद्योगाचें माहात्म्य व्यक्त होत आहे.

कोणताहि उद्योग करणें तो शास्त्रसिद्ध असावा, ह्मणजे, त्याची कांहीं तरी नियमित दिशा ठरलेली असावी. 'एक धड ना भाराभर चिंध्या' असा प्रकार करूं नये. आज कारकुनी, उद्यां वैद्यकी, परवां वकिली असा अव्यवस्थितपणाचा उद्योग बिलकुल हितकारक न होतां उलट त्रासदायक व कंटाळवाणा होतो. दोन्ही दगडांवर पाय ठेवूं पाहणारा मनुष्य केव्हांतरी तोंडघशींच पडावयाचा! यासाठीं कोणताहि उद्योग करणें तो विचारपूर्वक निश्चित करावा व तो दृढनिश्चयानें, प्रामाणिकपणानें आणि दक्षतेनें चालवावा ह्मणजे त्यामध्यें चांगली द्रव्यप्राप्ति व प्रशस्त कीर्तिलाभ होतो.

प्रिय विद्यार्थीबंधु हो, वरील विवेचनावरून आपल्या लक्ष्यांत आलेंच असेल कीं, आपणास कांहीं तरी नियमित उद्योग केल्यावांचून गत्यंतर नाहीं. कोणत्याहि 'नियमित उद्योगाला', 'कला' अशी संज्ञा आहे. प्राचीन ग्रंथांमध्यें चौसष्ट प्रकारच्या कला सांगितल्या आहेत. प्रत्येक मनुष्याची परिस्थिति निरनिराळी असते. तसेंच 'भिन्नरुचिर्हि लोकः'

या न्यायानें प्रत्येकाची आवडनिवडहि वेगवेगळी असते. तेव्हां आपल्या परिस्थितीला व आवडीला अनुरूप अशी कांहींतरी कला विचारपूर्वक शोधून काढून तिचें मनापासून अध्ययन केलें असतां तें पुढें हितकर होतें. जगामध्यें गुण-वैचित्र्य व रुचिभिन्नत्व बरेंच असतें. एखाद्याला उत्तम चित्रें काढण्याचें नैसर्गिक कौशल्य असतें किंवा अल्प आ-यासानें चित्रकलेमध्यें चांगलें प्रावीण्य संपादितां येतें, ए-खाद्याची गायनकलेकडे स्वाभाविक प्रवृत्ति असते व त्याला थोड्या प्रयत्नानें ती सहज साध्य होते. कोणाला उत्तम लेख लिहिण्याची हातोटी साधलेली असते, तर कोणी वक्तृत्वामध्यें निष्णात असतो. अशा रीतीनें निरनिराळ्या कलांत अनेक लोक वाकबगार असतात. पैसा मिळविण्याला अंगांत कांहीं तरी कसब पाहिजे. मनुष्याच्या अंगांत कर्तृत्वशक्ति असली म्हणजे तिचा विकास आपोआप होतो. एका सुभाषितकारानें म्हटलें आहेः—

यदि सन्ति गुणाः पुंसां विकसंत्येव ते स्वयम् ॥
न हि कस्तूरिकागंधः शपथेन विभाव्यते ॥ १ ॥

भावार्थ—मनुष्याच्या अंगांत जर गुण असले तर ते आ-पोआप प्रगट होतात. उदाहरणार्थ, कस्तुरीचा सुवास उत्तम असतो अशी कोणाचीहि खात्री करून देण्यास शपथ घेण्याची जरूर नसते. कारण, कस्तुरीचा सुगंध प्रेक्षकाला आपण होऊनच आनंदित करितो ! सारांश, व्यवहारांत कोणती तरी एखादी कला अवगत असणें अवश्य असतें, व कलावान् मनुष्याला द्रव्य संपादन सहज करितां येतें.

आतां हल्लींच्या शिक्षणक्रमाकडे लक्ष्य दिलें असतां स्व-तंत्र रीतीनें एखाद्या विषयाचा अभ्यास करण्याचा सोईस्कर मार्ग उपलब्ध नाहीं, ही गोष्ट खरी आहे. तरी मायबाप दया-

ळु सरकारच्या कृपादृष्टीनें शिक्षणखात्यांत अजून कांहीं उपयुक्त सुधारणा व्हावयाच्या आहेत ! तोंपर्यंत आपण आपल्या आवडीप्रमाणें निदान एकातरी विषयाचें मनःपूर्वक विशेष अध्ययन करणें हितावह आहे. यावरून एकाच विषयाच्या मागें लागून बाकीच्या विषयांवर पाणी सोडावयाचें असें कोणीं समजूं नये. वास्तविक पाहतां ' सर्व विषयांचें ज्ञान असणें हें, खरें शिक्षण होय. ' परंतु एका ग्रंथकारानें ह्मटलें आहेः—

अनंतपारं किल शब्दशास्त्रं । स्वल्पं तथाऽऽयुर्बहवश्च विघ्नाः ॥
सारं ततो ग्राह्यमपास्य फल्गु । हंसैर्यथा क्षीरमिवांबुमध्यात् ॥

भावार्थ—हंस जसे जलसंचयामधून दुधाचा मात्र स्वीकार करितात, त्याप्रमाणें शास्त्रांचा विस्तार अफाट असल्यामुळें व आयुष्य ' जललोलबिंदुवत् ' चपल व अल्प असल्यामुळें आणि अनेक प्रकारच्या अडचणीमुळें मनुष्यानें नानाविध शास्त्रांचें सार ग्रहण करून बाकीचा भाग टाकून द्यावा. सारांश, एका विषयाचें होईल तितकें साग्र अध्ययन करावें. व बाकीच्या इतर विषयांची साधारण माहिती करून घ्यावी. कोणत्याहि विषयाची किंवा कलेची निवड मात्र काळजीपूर्वक करावी. नाहीं तर ' ओबी गया और तोबी गया ' असा प्रकार व्हावयाचा ! यास्तव, कोणत्या तरी एका कलेमध्यें आपलें बुद्धिचातुर्य प्रकट करणें बरेंच हितावह असतें. कारण, या योगानें बुद्धि चोहोंकडे फांकत नाहीं व सर्व लक्ष्य एका विशिष्ट कलेकडे लावितां येतें; इतर कलांचें ज्ञान त्या विशिष्ट कलेच्या अनुषंगानें असावें ह्मणजे झालें.

(३) आरोग्यरक्षण—आरोग्य हें सुखाचें एक मोठें साधन आहे. इंग्लिश भाषेंत एक ह्मण आहेः ' Heath is wealth ! ' ह्मणजे, आरोग्य हेंच वैभव होय. परंतु,

'Health is happiness!' ह्मणजे, आरोग्य हेंच सौख्य होय, असें ह्मणणें ज्यास्त शोभेल. मनुष्याचें किंवा कोणत्याही प्राण्याचें जीवित्व आरोग्यावर अवलंबून आहे. आरोग्यावांचून जिणें व्यर्थ होय. ज्याच्या घरीं लक्ष्मी पाणी भरीत आहे, परंतु जेथें रोगांनीं कायमचें बिऱ्हाड करून ठेविलें आहे, अशा घरांत राहणाऱ्या मनुष्यापेक्षां, ज्या घरांत लक्ष्मीची वक्रदृष्टि असून सर्व मनुष्यें निरोगी आहेत, अशा घरांतील मनुष्यें मोठीं दैववान् समजलीं पाहिजेत. ऐष-आरामाच्या वस्तूंनीं भरगच्च भरलेल्या राजवाड्यांत राहणाऱ्या रोगपीडित मनुष्यापेक्षां खोपटांत राहणारा व मीठभाकर खाणारा मजूर ज्यास्त सुखी होय. सारांश मनुष्याचें सौख्य आरोग्यावर जितकें अवलंबून असतें, तितकें संपत्तीवर नसतें.

धान्यसंग्रह करण्याचा मुख्य काळ जसा हिंवाळा आहे, त्याप्रमाणें तारुण्य हें आरोग्य संपादनाचें वय आहे. लहानपणापासून शरीरप्रकृति निकोप असणें फारच थोड्या लोकांच्या नशिबीं असतें असें नाहीं, पण पुष्कळ लोक जाणूनबुजून किंवा हयगयीनें आपल्या मुलांबाळांच्या आरोग्याकडे द्यावें तसें लक्ष्य देत नाहींत, ही अत्यंत दुःखाची गोष्ट होय! 'शिक्षणसूत्रें' या ग्रंथांत ह्मटलें आहे, 'आईबापांचें मुलांसंबंधीं जें परोपकारविषयक कर्तव्य आहे त्यांत त्यांनीं त्यांच्या शरीराचें संगोपन करणें व मनाचें संगोपन करणें ह्याचा समावेश होतो. मग तसें करण्यास अडचणी कितीहि असोत. संसारयात्रा सुखकर करून घेतां येण्याचें सामर्थ्य जर मुलांचे ठायीं आणून द्यावयाचें असेल तर आईबापांनीं शरीरसामर्थ्य व मनःसामर्थ्य दोन्ही आणून द्यावयास पाहिजेत.' लहानपणीं मुलांच्या आरो-

ग्याची जबाबदारी मुख्यतः आईबापांवर असते. पुष्कळ मुलें ह्वाडपणानें व निष्काळजीपणानें आरोग्याची खराबी करून घेतात असें ह्मणण्यापेक्षां बरेच आईबाप फाजील लाडानें व घातुक संवयींच्या योगानें मुलांचें आरोग्य बिघडविण्यास कारणीभूत होतात, असें ह्मणणें सत्याला अधिक धरून होईल ! आपल्या देशाच्या बंसंधानें विचार केला तर मुख्यतः आईबापांच्या अज्ञानामुळें व कित्येक प्रसंगीं हयगयीमुळें लहान मुलांच्या आरोग्याची बरीच हेळसांड होत आहे असें दिसून येतें ! तसेंच, आमच्या देशांतील एकंदर लोकांच्या शारीरिक व मानसिक संपत्तीचा ऱ्हास होत चालला आहे असेंही आढळून येतें ! आतां, असा ऱ्हास होण्याचीं कारणें बरींच आहेत, ही गोष्ट खरी आहे, तरी अजून शरीरसंपत्तीचें श्रेष्ठत्व आमच्या लोकांत नीटपणें कळत नाहीं असें ह्मणणें भाग येतें ! कारण, जर आह्मांस शरीरसंपत्तीचें महत्व कळलें असतें तर हजारों मनुष्यें अकालीं मृत्युमुखीं पडलीं नसतीं ! यावरून आपल्या देशांत शारीरिक संपत्तीविषयीं किती औदासीन्य आहे हें अगदीं उघड आहे.

'शिक्षणसूत्रें' या ग्रंथांत ह्मटलें आहे:– "जगांत आपली सरशी होण्यास चांगली शक्ति आंगांत असणें ही पहिली आवश्यक गोष्ट होय, हें आतां कोठें लोकांच्या ध्यानांत येऊं लागलें आहे! नुसती बुद्धि तरतरीत आहे, पण तिचा उपयोग करच्यास अंगांत पुरेशी ताकद नाहीं, तर तिजपासून बहुतेक कांहींच फायदा करून घेतां येणार नाहीं. ह्मणून शक्तिपात करून घेऊन बुद्धि तरतरीत करून घेणें हें वेडेपण होय. लहानपणीं मानसिक श्रम फाजील करून अचाट बुद्धि दाखविणारीं मुलें शेवटीं निरुपयोगी होतात. आरोग्याचे नियम कोणत्याहि प्रकारें मोडणें हें 'शारीरिक

पाप ' होय ! " यावरून शरीरप्रकृति निरोगी असणें किती अवश्य आहे हें उघड आहे.

' शिक्षणसार ' या पुस्तकांत ह्मटलें आहे:- " असें वारंवार घडतें कीं, विद्यार्थी आपल्या कोत्या समजुतीमुळें आपली शक्ति किती हें न जाणून जसजसा ज्ञानाचा अमर्याद समुद्र त्याच्या दृष्टीस पडूं लागतो, तसतसा आपल्या पुस्तकांपासून क्षणभरही न हालतां आपण जाडा विद्वान् होईपर्यंत विश्रांति घ्यावयाचीच नाहीं, असा निश्चय करितो. शरीरप्रकृतीच्या संबंधानें तर पहिल्यापासून त्याजकडून इतकी हयगय होते, आणि तेणें करून त्याच्या शक्ति इतक्या क्षीण होतात कीं,पुढें त्याच्यानें मुळींच व्यासंग होईनासा होतो, आणि मृत्यूचें ठाणें आपल्या शरीरांत बसलें असें त्यास लवकरच दिसून येतें; पण उपयोग काय? एकदां हातचा लगाम गेल्यावर मग काय इलाज चालतो? या प्रमाणें अनेक होतकरू लोकांवर आजपर्यंत मृत्यूनें अकालीं धाड घातली आहे ! असें होण्याचें कारण त्यांनीं जिवापाड व्यासंग केला हें केवळ नव्हे, तर ते आपल्या शरीराच्या आरोग्याविषयीं बेफिकिर राहिलें हें होय.

आपल्या समाजांतील वृद्ध मनुष्यांचें आरोग्य व तिशीच्या आंतील वय असणाऱ्या मनुष्यांचें आरोग्य यांविषयीं सूक्ष्मदृष्टीनें विचार केला तर आमच्या देशांतील शारीरिक संपत्तीचा ऱ्हास किती झपाट्यानें होत चालला आहे, हें स्पष्ट दिसून येतें ! आपल्या वाडवडिलांची शरीरप्रकृति सुदृढ व निकोप होती असें समजून आपण शरीरप्रकृतीची उपेक्षा करणें इष्ट नव्हे. कारण, आपण त्यांच्यापेक्षां बऱ्याच भिन्न परिस्थितीमध्यें सांपडलों आहों. ' नीतिबोधां ' त ह्मटल्याप्रमाणें " हल्लीं पहावें तों जिकडे तिकडे फिकट तोंडें, खोल डोळे, बसलेले गाल, हाडांचे सांपळे, खुरटलेली वाढ,

क्षयाचीं चिन्हें, अकालिक मृत्यु यांची अगदीं रेलचेल उडून गेली आहे !" शिव शिव ! काय ही आमच्या शारीरिक संपत्तीची दुर्दशा ! ईश्वर करो आणि अजून तरी आमच्या समाजांतील लोकांस आरोग्याची कळकळ वाटो ! आमच्या समाजास झालेला हा शरीरऱ्हासाचा रोग, बरा करणारा धन्वंतरी कधीं भेटेल तो भेटो ! पण आपल्या आरोग्याची हेळसांड करणें खचित इष्ट नव्ह. माघ कवि ह्मणतो:—

उत्तिष्ठमानस्तु परो नोपेक्ष्यः पथ्यमिच्छता ।
समौ हि शिष्टैराम्नातौ वर्त्स्यंतावामयः स च ॥ १ ॥

तसेंच एक मराठी कवि ह्मणतो:—

विषवल्ली जों वाढ नेघे । तों खंडूनि टाकावी वेगें ॥

भावार्थ:—जोंपर्यंत एखाद्या रोगानें शरीरांत कायमचें बिऱ्हाड केलें नाहीं तोंच त्यास हाकून देणें योग्य असतें. शरीरांत जोंपर्यन्त रोगरूपी विष भिनलें नाहीं, तोंच तें काढून टाकणें इष्ट असतें. खरोखर ज्याला निरंतर आरोग्यसौख्य मिळत आहे, तो मनुष्य मोठा दैववान् समजला पाहिजे. कोणी थोर ग्रंथकार ह्मणतो,— " आरोग्याचा महिमा किती ह्मणून सांगावा ! हे आरोग्य देवते ! जगांतील सर्व संपत्तिपेक्षांही तुझी योग्यता अधिक आहे ! बाई. तुझ्या योगानें मनुष्याचें मन सुशिक्षित होतें. तो विद्यासंपन्न होऊन कीर्ति व ऐश्वर्य मिळवितो, व वृद्धापकाळीं अमोलिक सौख्य प्राप्त करून घेतो. एकंदरीनें ज्यावर तुझी कृपा झाली त्याला जगांत कांहींच उणें नाहीं; पण ज्यावर तुझी अवकृपा झाली त्याला हें जग असून नसून सारखेंच आहे ! एवढा तुझा महिमा असून तुझें सौजन्य तरी केवढें कीं, तुझी कृपा किंवा अवकृपा संपादन करणें हें तूं ज्याचें त्याच्यावरच ठेविलें आहेस !" तसेंच आरोग्याविषयीं दुसरा एक

ग्रंथकार ह्मणतो कीं, आपण गरीब असलों किंवा आपणास कांहीं गैरसोयी असल्या तरी आपण सतत उद्योगाच्या योगानें चांगल्या स्थितीला पोहोंचूं. परंतु जर का आपली शरीरप्रकृति क्षीण झालेली असली, तर चांगली स्थिति प्राप्त करून घेण्यास आपणास कोणताहि उपाय करवणार नाहीं !

वरील विवेचनावरून व उताऱ्यावरून हें सिद्ध आहे कीं, आरोग्य हें सर्व सौख्यांचें मूळ आहे, गेलेली संपत्ति मिळवितां येते, पण नष्ट झालेलें आरोग्य पुनरपि प्राप्त होणें बरेंच दुरापास्त असतें. आपली सर्व आशा, उमेद व कर्तबगारी आरोग्यावर अवलंबून असते, इतकेंच नव्हे तर आपलें आयुष्यहि आरोग्यावरच अवलंबून असतें ! यावरून हें उघड आहे कीं, जगामध्यें आपलें वर्चस्व असावें, आपल्या हातून मोठाले पराक्रम व्हावे अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं शारीरिक संपत्ति संपादण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तारुण्यांत मनोवृत्ति अत्यंत प्रबल असतात व जसजसें उतार वय होत जातें मसतसा त्यांचा जोम कमी होत जातो. खरोखर आरोग्य हें तरुण मनुष्याचें भूषण होय ! डीकेन्सनें एकेठिकाणीं ह्मटलें आहे,– ' Youth is the age of noble impulses ! ' तसेंच डिझ्राएलीनें ह्मटलें आहे, The history of heroes is the history of youth, almost every thing that is great has been done by youth ! यावरून तारुण्य हें पुरुषार्थ संपादनाचें वय आहे, हें अगदीं उघड आहे. इंद्रिय-विज्ञान-शास्त्रावरून हें सिद्ध आहे का, शरीर व मेंदू यांचा अगदीं निकट संबंध आहे, एकाचें जर योग्यप्रकारें पालन व वाढ होईल तरच दुसऱ्याचें योग्यप्रकारें पालन व वाढ होते. ' A sound mind in a sound body ' ह्या इंग्रजी ह्मणीचा भावार्थ हाच आहे. तसेंच फ्रेंच ग्रंथकार मॉंटेन याणें ह्मटलें आहे,

In order to brace the mind You must brace the muscle! यावरून शरीराचा व मेंदूचा किती निकट संबंध आहे, हें दिसून येईल.

सर्व क्रियांविषयींच्या प्रेरणेचें आदिस्थान मन होय. बुद्धि केवळ वाट दाखविणारी वाटाड्या आहे ! शरीरप्रकृति सुदृढ असली ह्मणजे मनाचे व्यापार सुरळितपणें चालून बुद्धिहि निरंतर तरतरीत राहते. शरीरप्रकृति निरोगी राहण्याला जीं कित्येक साधनें आहेत त्यांमध्यें ' व्यायामा ' ची गणना प्रमुखपणें होते. व्यायामाची आवश्यकता इतकी आहे कीं, एकवेळ शरीरप्रकृतीला अवश्य असणाऱ्या इतर साधनांचा आभाव पुरवला, पण व्यायामावांचून प्रकृति निकोप कधींच रहावयाची नाहीं ! प्राचीनकाळीं विद्यार्थ्यांचीं कर्तव्यें अशा बेतानेंच ठरविलेलीं असत कीं तीं करितांना व्यायाम सहज व्हावा. परंतु आतां घोकंपट्टी पुढें व्यायामाची मात्राच चालत नाहीं ! शेंकडों विद्यार्थी परीक्षेकरितां जीव लावून अभ्यास करीत असतात. प्रकृति अशक्त असून ज्यांच्या मेंदूवर अभ्यासाचा मोठा थोरला बोजा पडतो ते लौकरच क्षीण होतात व त्यांचे सर्व परिश्रम व्यर्थ होतात ! थोड्या दिवसां पूर्वी जयपूर येथील एका तरुण होतकरू विद्यार्थ्यानें अकालीं मृत्युमुखीं पडतांना उद्गार काढिले आहेत, ते असेः—"Let not my friends aspire to univerrity distinctions at the expense of health !!!" याचा बोध घेऊन शरीरप्रकृति निरंतर सुदृढ ठेवणें हें विद्यार्थ्याचें तिसरें प्रमुख कर्तव्य आहे.

हल्लींचा काळ असा आहे कीं ज्याच्या मनगटांत जोर आधीक तेंच राष्ट्र शेवटीं विजयी होतें. जो मनुष्य निरोगी आहे तो आपल्या कुटुंबाचें संरक्षण हरतऱ्हेनें करूं सहज शकतो. ज्या विद्यार्थ्याचे अंगीं आरोग्यजन्य आवेश, स्वाभिमान व

धिटाई आहे तो दीर्घ प्रयत्न करून अनेक परीक्षांतून उत्तीर्ण होऊन आपलें कल्याण करूं शकतो. यासाठीं, प्रिय विद्यार्थी जन हो, व्यायामाची हेळसांड करून प्रकृतीची खराबी करूं नका; आरोग्य हें सर्व पुरुषार्थांचें बीज आहे, हें लक्ष्यांत ठेवा व होईल तितकी प्रकृति सुदृढ व निरोगी राखा; यांत तुमचें कल्याण आहे !

प्रकरण ४ थें.

विद्याभ्यास.

The life that is devoted to knowledge passes silently away. To talk in public, to think in solitude, to read and to hear, to inquire and answer inquiries is the business of a scholar. He wanders about the world without pomp or terror and is neither known nor valued but by men like himself ! "

Johnson–Rasselas.

कोणत्याहि राष्ट्राची सुधारणा शिक्षणावर बहुतांशीं अवलंबून असते. शिक्षणानें मनुष्याचें मन विकसित होतें, शिक्षणानें मनुष्याच्या मनांत उदात्त वृत्तींचे अंकूर जोरानें उद्भवतात व शिक्षणानें आत्महित करून परहित साधण्याची दिशा बरोबर समजते. सुशिक्षित मनुष्याला आत्मोन्नतीची जितकी आवड आणि कळकळ असते, तितकी–किंबहुना ज्यास्त–कळकळ त्यास बहुजनसमाजाच्या हिताविषयीं वाटत असते–तसेंच शिक्षणानें ऐहिक व पारलौकिक उन्नतीचे प्रयत्न सुशिक्षित मनुष्याकडून आस्थापूर्वक होत असतात. हल्लीं जगांत चाललेल्या राजकीय घडामोडींकडे दृष्टि फेंकली

तर युक्तिप्रयुक्तीचे डाव पेंच व शिक्षणजन्य महत्वाकांक्षा यांचें मनगटाच्या जोराशीं मिश्रण होऊन अहमहमिकेचें वाग्युद्ध सुरू झालें आहे. कित्येक भाग्यशाली देश आपापल्या वर्चस्त्राचें घोडें पुढें पुढें ढकलीत आहेत! परंतु कित्येत दैवहीन राष्ट्रें शिक्षणाच्या अभावामुळें रसातळास जाऊं पाहत आहे ! सारांश, शिक्षण हें मनुष्याच्या आधिभौतिक व आध्यात्मिक उन्नतीच्या मुळाशीं बीजरूपानें असतें, हासिद्धांत अगदीं निर्विवाद सिद्ध आहे.

शिक्षणानें मनुष्याची ऐहिक व पारलौकिक उन्नति होते असें वर सांगितलेंच आहे. परंतु आपण पाहातों कीं, पुष्कळ लोकांना मिळालेल्या शिक्षणाचा उपयोग व्हावा तसा होत नाहीं. असा प्रकार आपल्या देशांत बराच दृष्टीस पडतो. याचीं कारणें मुख्यत्वेंकरून दोन संभवतात. एक, हल्लींची शिक्षणपद्धति कांहीं अंशीं सदोष असावी हें व दुसरें, हल्लींची कांहीं अंशीं चमत्कारिक परिस्थिति आहे, हें होय ! या दोन कारणांशिवाय तिसरें कारण बहुधा संभवत नाहीं. परंतु कशीहि परिस्थिति असली तरी सत्याचा लोप कधींहि व्हावयाचा नाहीं, हें लक्ष्यांत आणिलें असतां शिक्षणाचा योग्य परिणाम झालाच पाहिजे असें दिसून येतें. शिक्षणाचा मुख्य उद्देश हा असतो कीं, जेणेंकरून मन सुसंस्कृत व प्रगल्भ होईल असें त्यास वळण लावणें. सर्व इंद्रियांमध्यें मन हें प्रधान आहे. तेव्हां तें सुसंस्कृत असणें श्रेयस्कर आहे. चंचल मनोवृत्तींस आंवरून धरणें, सुस्त मनोवृत्तींस जागृत करणें, ज्ञानेंद्रियांस बळकटी देणें, सुमनोविकारांस उत्तेजन देणें, दुर्विकारांस दाबून टाकणें हीं कामें मनाला योग्य संस्कार घडल्याखेरीज व्हावयाचीं नाहींत. यावरून ज्याच्या योगानें मनोवृत्तींना योग्य संस्कार होतो तेंच वास्तविक खरें शिक्षण होय.

नुसती पोपटपंची केल्यानें किंवा भाराभर पुस्तकें पालथीं घातल्यानें शिक्षण मिळालें असें ह्मणतां यावयाचें नाहीं !

१ शिक्षणाचा क्रम निरंतर चालू ठेवणें ह्मणजेच ' विद्याभ्यास करणें ' होय. जोंपर्यंत शाळेंत रहावयाचें तों पर्यंतच विद्याभ्यास करावयाचा असें नाहीं. ' शाळा सुटली कीं विद्या संपली; ' असें समजणें निव्वळ चुकीचें आहे. वास्तविक ह्मटलें तर शाळा सोडल्यावरच विद्याभ्यासास खरा आरंभ होतो. शाळा ही फक्त मार्ग दाखविण्याकरितां आहे. शाळा ह्मणजे विद्यादेवीची ओळख करून देणारी जागा होय. विद्यादेवीची ओळख झाल्यावर जन्मभर सतत अभ्यास सुरू ठेवणें ह्मणजेच विद्यादेवीची आराधना करून तिला प्रसन्न करणें होय ! एका सुभाषितकारानें ह्मटलें आहेः—

क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च चिन्तयेत् ॥

भावार्थः—तुह्मांला विद्यादेवीच्या अनुग्रहाची अपेक्षा असली तर एक क्षणहि न विसंबतां तिची सेवा करा. बरें तुह्मांला पुष्कळसें द्रव्य मिळविण्याची इच्छा शसली तर एक कण सुद्धां फुकट घालवूं नका ! आपल्या त्या आर्यभूमींत केवळ विद्यार्जनामध्यें निमग्न असणारे अनेक मुनि प्राचीनकाळीं होऊन गेले. परंतु अर्वाचीनकाळीं विद्याभ्यासनिमग्नचित्त लोकांची संख्या फारच थोडी आहे, असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें ! परंतु सुधारलेल्या पाश्चात्य देशांमध्यें विद्यानंदांत सुखानें पोहणारे अनेक लोक होऊन गेले आहे ! सर वुइल्यम् जोन्स ह्यानें न्यायाधिशीचें काम संभाळून मनुस्मृति, शाकुंतलादि संस्कृत नाटकें यांचें इंग्रजींत भाषांतर केलें ! डाक्टर वुइल्सन् यानें इकडील कित्येक भाषांचें अध्ययन करून कीर्ति मिळविली ! तसेंच एल्फिन्सन्, मालकम, कोलूब्रूक, ब्रूहम्, बुलवर लिटन् वगैरे अनेक राजकारणी पुरुष विद्याभ्यासा-

विषयीं नामांकित होऊन गेले ! इंग्लंडांतील सर्वप्रसिद्ध मुत्सद्दी ग्लॅडस्टन साहेब यांना ' जन्मविद्यार्थी ' ह्मणवून घेण्यांत मोठें भूषण वाटत असे व त्याप्रमाणें त्यांचा दीर्घ व्यासंगहि असे ! प्रसिद्ध विद्वान् प्रो. मॅक्स मुल्लर यांनीं ऋग्वेद तपासून त्याचें इंग्रजी भाषांतर केलें आहे ! काय हा अचाट विद्याव्यासंग ! नाहींतर आमच्या इकडील विद्यार्थी परिक्षेंतून पसार झाल्याबरोबर पुस्तकांस कायमची सोडचिठ्ठी देऊन ' हुश्श हुश्श ' करीत ' बावन्न अध्यायी ' गीतेचें अध्ययन आरंभितात व ' गप्पाष्टकां , चा व्यासंग अव्याहत सुरू ठेवितात ! शिव शिव ! अशानें आमचा निभाव कसा लागणार ! बा हिंदुस्थाना, जोंपर्यंत असेच दिवस कायम राहतील तोंपर्यंत उत्कर्षाची आशाच नको ! ! !

अभ्यास ह्मणजे ज्ञानासाठीं करावयाचे अव्याहत प्रयत्न. प्रयत्नच केले नाहींत तर अभ्यास झाला नाहीं या ह्मणण्यांत काय अर्थ ! आपण पाहतों कीं, जो विद्यार्थी झटून आपले धडे चांगले तयार करितो त्याचा अभ्यास झाला असें ह्मणतां येतें. आंग मोडून मेहनत केल्याशिवाय विद्यादेवीचा प्रसाद प्राप्त कसा होणार ? एक कवी ह्मणतोः—

सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम् ॥

भावार्थः—केवळ सुखाची इच्छा करणाराला विद्या कशी होणार ? तसेंच निरंतर विद्याभ्यास करणाला सौख्य कोठून होणार ? परंतु हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, केवळ सुखेच्छूला विद्या केव्हांहि व्हावयाची नाहीं. परंतु विद्यार्थ्यांचें तसें नसतें. त्यांना आरंभीं कितीहि प्रयास पडले तरी परिणामीं उत्तम सुख प्राप्त होतें. सुख तीन प्रकारचें आहे. राजस, तामस आणि सात्विक. ह्यांचीं लक्षणें गीतेमध्यें सांगितलीं आहेतः—

" अभ्यासाद्रमते यत्र दुःखांतं च निगच्छति ॥
यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ॥ १ ॥
तत्सुखं सात्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ॥
विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ॥
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥ २ ॥
यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मनः ॥
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥ ३ ॥"

अध्याय १८

वरील लक्षणांवरून' सात्विक सुख' ' सर्वोत्कृष्ट' होय हें-उघड आहे. हें सुख विद्याभ्यासाशिवाय प्राप्त व्हावयाचें नाहीं. ' घाव सोसल्या वांचून जशी देवकळा येत नाहीं, त्याप्रमाणें निरंतर प्रयत्न केल्याशिवाय विद्याभ्यास व्हावयाचा नाहीं. यास्तव, ज्यांना विद्यादेवीच्या रम्य उद्यानांत यथेच्छ विहार करावयाचा असेल त्यांनीं सदोदित व्यासंग चालू ठेविला पाहिजे.

एका ग्रंथकारानें ह्मटलें आहे ' इतिहासाच्या अभ्यासानें मनुष्य अनुभविक होतो ; कवितेच्या अभ्यासानें रसिक-होतो ; नीतिशास्त्राच्या योगानें गंभीर होतो ; न्याय व अलंकार ह्या शास्त्रांच्या अभ्यासानें वादविवाद करण्यास समर्थ-होतो; गणितशास्त्राच्या अध्ययनानें एकाग्रबुद्धि होते . ' परंतु ह्या विषयांचा अभ्यास आवड, अनुकूल परिस्थिति यांना अनुसरून पद्धतशीर झाला पाहिजे.

विद्याभ्यास करितांना पुस्तकांविषयीं खबरदारी घेणें अवश्य असतें. कोणत्याहि भाषेंत प्रसिद्ध होणारीं सर्वच पुस्तकें ह्मणजे सर्वांना वाचनीय होतील असें नाहीं. कित्येक पुस्तकें तर इतकीं गचाळ, नीरस व टाकाऊ असतात कीं,

त्यांच्या स्पर्शानें व वाचनानें विद्यार्थ्यांनीं आपले हात आणि मनें विटाळवूं नयेत ! शृंगारिक पुस्तकांकडे कधीं ढुंकूनसुद्धां पाहूं नये. अश्लीलपणा व चावटपणा यांनीं भरलेल्या पुस्तकांचें तर दर्शनदेखील घेऊंनये. याचें कारण, वाईट पुस्तकें हीं वाईट मित्रांसारखीं अपकार करणारीं असतात. कुसंगतीपासून जशी भयंकर हानि होते, त्याप्रमाणेंच वाईट पुस्तकांच्या वाचनापासून मनोवृत्ति कलुषित होतात. समुद्राच्या तळीं इकडे तिकडे पडलेलीं मोत्यें काढण्यास गेलें असतां चिखलांत रुपण्याचें भय असतें, त्याप्रमाणेंच वाईट ग्रंथांतील चांगलीं स्थलें शोधितांना मन बिघडण्याचा संभव फार असतो ! परंतु चांगल्या ग्रंथांची गोष्ट तशी नसते. चांगले ग्रंथ हे संसारसमुद्रांतील खडकांवरचे अक्षय्यदीप (Everlasting light houses !) होत ! ते आपणास येणाऱ्या अडचणींचें व संकटांचें स्पष्ट स्वरूप दाखवून सावध करितात, संकटनिर्मुक्त कसें व्हावें हें सुचवितात आणि आपली जीवननौका योग्य मार्गावर आणून ठेवितात ! यावरून, वाईट पुस्तकें व चांगले ग्रंथ ह्यांमध्यें किती अंतर आहे ! चांगल्या ग्रंथांचें अध्ययन करणें कसें यशस्कर आहे हें उघड आहे. ‘ इतर ग्रंथविलोकन ’ हें ‘ विद्येला एक विघ्न ’ ह्मटलें आहे, तरी आपला नित्याभ्यास संभाळून उत्तम ग्रंथ वाचण्यांत कांहीं अहित आहे असें नाहीं.

वाचन—लहान मुलांस वाचतां येऊं लागलें ह्मणजे मोठा आनंद होतो. याचें कारण, एक तर त्यांच्या मनाचें रंजन होतें व दुसरें त्यांना विविधविषयांचें ज्ञान होतें. वाचनापासून बारीकसारीक लाभ पुष्कळच आहेत, पण त्यांत मनोरंजन व ज्ञानप्राप्ति हे दोन मुख्य आहेत.

लोकसमूहामध्यें मनोरंजन करण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्यांमध्यें, पुस्तकवाचन, हा एक आहे. वाचनाच्या योगानें आपणास प्राचीन काळापासून आजपर्यंत झालेल्या मोठमोठ्या लोकांशीं बोलतां येतें; त्यांचे उत्तम विचार घेतां येतात; व योग्य रीतीनें वाचन चालविलें असतां त्यांचे विचार ते आपलेच करून टाकितां येतात ? असें एका ग्रंथकारानें ह्मटलें आहे, तें अक्षरशः खरें आहे.

लॉर्ड बेकन ह्मणतो 'वाचनाच्या योगानें मनुष्य पूर्ण होतो हें खरें आहे, परंतु तो तसा होण्यास ग्रंथ-वाचन योग्य रीतीनें चालविलें पाहिजे. अर्थज्ञानविरहित नुसत्या कोरड्या वाचनानें मनुष्याला पूर्णता कधींहि येणार नाहीं; यासाटीं वाचन, अर्थ समजून व लक्ष्यांत राहील अशा बेताचें असावें. नाहींतर तुकोबांनीं ह्मटल्याप्रमाणें—

व्यर्थ भराभर केलें पाठांतर। जोंवरी अंतर शुद्ध नाहीं ॥
घोडें काय थोडें वागवितें ओझें। भावावीण वांझें पाठांतर॥

अशा प्रकारचें भरधांव वाचन कांहीं उपयोगाचें नाहीं ? कारण, त्याच्या योगानें इष्टस्थलीं पोहोंचण्यापूर्वीच तें कोठें खाड्यांत घालील याचा नियम नसतो ! कित्येक लोक असें समजतात कीं, ज्यांच्याजवळ मोठा ग्रंथसंग्रह आहे, किंवा ज्यांनीं शेंकडों ग्रंथांचीं पारायणें केलीं आहेत ते मोठे विद्वान् ! परंतु केवळ वाचलेल्या पानांच्या संख्येवरूनच जाड्या विद्वत्तेचें अनुमान करणें चुकीचें आहे ! एक ग्रंथकार ह्मणतो "जो पुष्कळ वाचितो, तो थोडेंच समजतो !" सारांश, खरी विद्वत्ता पुष्कळशा वाचनांत नसते. थोड्याच उपयुक्त ग्रंथांचें सशास्त्रपणें अध्ययन केलें

म्हणजे तें यशस्कर होऊन त्याचा व्यवहारांत फार उपयोग होतो.

निबंधमालेमध्यें म्हटलें आहे "हल्लीं दरसाल शेंकडों ग्रंथ प्रसिद्ध होत आहेत व लोकांत वाचनाचा प्रचार चालला आहे. तरी, अत्यंत प्राचीन काळचेच महान् महान् ग्रंथकार कीर्तिमंदिराच्या अत्युच्च पदांवर जे एकदा अढळ बसले आहेत ते आहेत ! हल्लींच्या काळीं ज्ञानाचा केवढाहि फैलावा झाला तरी त्यांची सर कोणालाहि येत नाहीं !" खरें आहे. हल्लीं वाल्मीकि, व्यास, तुकाराम, मोरोपंत, वामनपंडितां सारखे कवि निपजताहेत काय ? रामायण भागवत भारतांसारखे अतिविस्तृत व सर्वोत्कष्ट ग्रंथ प्रसिद्ध होणें पुनः शक्य आहे काय ? यावरून लक्ष्यांत येईल कीं, उत्तरोत्तर खऱ्या विद्वत्तेचा ऱ्हास होऊन शुष्क पांडित्याचा खप जारीनें होत आहे ! त्याला कांहीं अंशीं अपवादक कित्येक उदाहरणें सांपडतील. पण विशेषतः विद्यार्थ्यांनीं प्राचीन ग्रंथांचें साग्र अध्ययन करण्याकडे ज्यास्त प्रवृत्ति ठेवावी. शक्य असेल तर रामायण भारताचा अभ्यास करावा नाहीं तर.

सुश्लोक वामनाचा अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ॥
ओंवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची ॥ १ ॥

या अर्वाचीन काव्यपाकनिष्पत्ती मध्यें आनंद व समाधान मानावें !

४ कालमान—विद्यार्थीअवस्थेमध्यें विद्यार्थ्यांचें मुख्य कर्तव्य विद्याभ्यास करणें हें आहे. प्राचीन तत्ववेत्त्यांनीं अभ्यासाचें लक्षण 'तत्र स्थितौ यत्नः' असें सांगितलें आहे. याचा सामान्य अर्थ, 'एखादी अज्ञेय गोष्ट जाणण्याचा

प्रयत्न करणें ' असा होतो. अशा प्रकारचे प्रयत्न लौकर सफल होणें किंवा न होणें मुख्यत्वेंकरून बुद्धीवर अवलंबून असतें. ज्याची बुद्धि चलाख असते, त्याला कोणत्याहि गोष्टीचें ज्ञान सहज होऊं शकतें. परंतु ज्याची बुद्धि मंद असते त्याला कोणताहि विषय लौकर समजत नाहीं. तथापि एवढी गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे कीं, अनियमितपणें अभ्यास करणाऱ्या तरतरीत बुद्धीच्या विद्यार्थ्यापेक्षां नियमितपणें अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यावर विद्यादेवीचा प्रसाद विशेष होतो ! यावरून ध्यानांत येईल कीं, दररोज नियमितपणें व व्यवस्थितरीतीनें अभ्यास करणें अवश्य आहे.

कित्येक विद्यार्थ्यांस असें वाटत असतें कीं, आपला सर्व काळ विद्याभ्यासांत जावा. परंतु ही चूक आहे. कारण, सर्व-काळ अभ्यास करित बसणें हें कांहीं अंशीं आळशी बनण्या-सारखेंच आहे. जर्मन वगैरे लोक सोळा किंवा अठरा तास रोज अभ्यास करितात. परंतु आपल्या देशांतील विद्यार्थ्यांस अनेक कारणांमुळें एवढा वेळ अभ्यास करवणार नाहीं. इतका वेळ अभ्यास करून आपल्या मानसिक व शारीरिक शक्तींस भागविण्यापेक्षां रात्रंदिवस मिळून सहा किंवा आठ तास नीट लक्ष्य लावून अभ्यास करणें हितावह आहे. परंतु ह्या अभ्यासाच्या वेळांत विद्यार्थ्याचें मन अभ्यासामध्यें अगदीं गर्क होऊन गेलें पाहिजे. नाहीं तर,

नळी फुंकिली सोनारें । इकडून तिकडे गेलें वारें ॥

अशा प्रकारच्या अभ्यासाचा काडीमात्रहि उपयोग नाहीं!

दिवसरात्र मिळून आठ तास अभ्यास केला ह्मणजे तो बहुधा पुरेसा व शरीरप्रकृतीला मानवण्यासारखा होतो. होतां होईल तों रात्रीं दहा वाजल्यापुढें अभ्यास करूं नये. कारण, फाजील जागरणानें डोळे बिघडतात. तसेंच सूर्योदया पर्यंत

सुस्तपणें अंथरुणावर पडून राहणें विद्यार्थ्यांस शोभत नाहीं. निदान पहांटेस पांच वाजतां उठून शौचमुखमार्जनादि विधि करून स्नान करावें व ईश्वराराधना करून अभ्यासास प्रारंभ करावा. पहांटेस उठून अभ्यास करणें सर्वांच्याच प्रकृतीस मानवतें असें नाहीं. यासाठीं, प्रकृत्यनुरोधानें सकाळीं लौकर उठण्याचा क्रम ठेवावा. पहांटेच्या प्रहरीं अभ्यास चांगला होतो असा आपल्या लोकांचा पुरातन समज आहे. परंतु हल्लींची परिस्थिति सर्वस्वीं भिन्न असल्यामुळें सांप्रत त्या समजा प्रमाणें सर्वथैव शक्य आहे असें ह्मणतां येत नाहीं.

५ एकांत वास—अभ्यास करण्यास एकांत जागा अवश्य पाहिजे. आपले प्राचीन ऋषि अरण्यामध्यें एकांतवास करीत हें प्रसिद्ध आहे. अभ्यासाकडे मन लागण्यास एकांतवास अवश्य आहे. कारण, त्यामुळें इतर गोष्टी डोळ्यां समोर येत नसल्यामुळें अभ्यासांत व्यत्यय येत नाहीं. तसेंच एकटें बसून अभ्यास करावयाच्या जागीं पुष्कळशा तसबिरी, चित्रें व इतर उपयुक्त वस्तु होतां होईं तों नसाव्या हें चांगलें. अभ्यास करितांना फार झालें तर एक दोन समवयस्क सहाध्यायी विद्यार्थी बरोबर असावे. या योगानें परस्परांस चांगला उपयोग व साह्य होतें.

६ अभ्यास करतेवेळीं शरीराची बैठक अशा रीतीनें ठेवावी कीं, जेणेंकरून खांदा आणि कंबर यांच्या मधील भागास पोंक येणार नाहीं. खुरमांडी घालून ओणवत एकसारखें लिहित वाचित बसल्यानें शरीर वांकतें व त्याला श्रमहि फार होऊन अशक्तता येते. खुर्चीवर बसून लिहिणें वाचणें झाल्यास पुढील टेबल उतरतें असून इतकें उंच असावें कीं, कमरे पासून मानेपर्यंत शरीराचा भाग ताठ

रहावा. खुर्चीवर बसून अभ्यास करण्यापेक्षां उभें राहून फेऱ्या घालीत अभ्यास करणें चांगलें. लहानपणापासून अशा रीतीनें व्यवस्थितपणें अभ्यास करण्याची संवय असली ह्मणजे मोठेपणीं शरीराची बळकटी कायम राहून काम करण्यास उमद वाटत असते.

७ अभ्यास करितांना डोळ्यांस फार जपलें पाहिजे. हल्लीं आपल्या देशांतील आधुनिक नवीन विद्वानांपैकीं कित्येकांस तरुणपणींच उपनेत्रांची गरज भासूं लागते. कित्ये तर हौसेकरितां हें डोळ्यांचें लोढणें अडकवून घेतात असें दिसून येतें ! कांहीं असो एकंदरीनें आधुनिक शिक्षण-पद्धतीचा जसजसा प्रसार होत जाणार तसतशी नेत्रशक्तीच्या ऱ्हासाची भीति वाटूं लागावयाची हें जर्मनी, फ्रान्स वगैरे देशांच्या अनुभवावरून सिद्ध आहे. ' शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ' हें तत्व अगदीं खरें आहे. ' आंधळ्यासी जग सारेंचि आंधळें ! ' अहाहा, ज्या भगवंतानें हें विश्वरूप विस्तीर्ण मनोहर प्रदर्शन निर्माण केलें आहे, त्याची अद्भुत लीला पाहण्याचें ज्यांस नेत्रसामर्थ्य नाहीं, ते खरोखर दुर्दैवी होत !

अलीकडे आपल्या देशांतील लोकांस दारिद्र्यानें पछाडिल्यामुळें ह्मणा किंवा अन्य कांहीं कारणामुळें ह्मणा, राकेल तेलाचा खप झपाट्यानें होत आहे. राकेलच्या चिमणीशीं रात्रीं बराचवेळ अभ्यास करित बसणें डोळ्यांना अपायकारक आहे. थोडा खर्च कमी लागतो हा फायदा पाहून डोळ्यांची खराबी करून घेणें इष्ट नव्हे. गोडया तेलाचा अगर मेणबत्तीचा दिवा अभ्यास करण्यास उत्तम. परंतु राकेलच्या दिव्याशीं फारसा संबंध न ठेवितां येईल तितका चांगला. ही गोष्ट मुख्यत्वेंकरून विद्यार्थ्यांनीं लक्ष्यांत ठेवणें अवश्य आहे.

८ विद्यार्थ्यांनीं हेंहि लक्ष्यांत ठेवणें जरूर आहे कीं, झालेल्या अभ्यासाची वरचेवर उजळणी करून ठेवावयाची 'पुढें पाठ व मागें सपाट' असा प्रकार बिलकूल उपयोगी नाहीं. एका ग्रंथकारानें ह्मटलें आहे " अभ्यास करणें हें देश जिंकण्यासारखें आहे. एखादा देश जिंकित असतां, आपणांस जें कांहीं आडवें येईल तें जिंकित गेलें, ह्मणजे मागची भीति नसल्यामुळें पुढें एकसारखा जयच होत जातो. परंतु जर मागें एखादा किल्ला, एखादी चौकी, एखादी लुटारू लोकांची टोळी, अशी आपण राहूं देत गेलों; तर जसजसे आपण पुढें जिंकित जाऊं, तसतसा आपण पूर्वी जिंकिलेला प्रदेश शत्रु घेत जाईल ! " मागचा अभ्यास जागृत व तरतरीत ठेविला नाहीं तर सर्व अभ्यास अर्धवोबडा व कच्चा राहतो. नांवाला मात्र मोठा देश ताब्यांत असण्यापेक्षां पुष्कळ लहान परंतु त्यांतील लोकांवर पुरा अंमल बसलेला देश स्वाधीन असणें चांगलें. हीच गोष्ट अभ्यासास लागु आहे. अभ्यास थोडथोडा कां होईना, पण तो व्यवस्थितपणें व मागचा तयार ठेवून करावा. लढाईच्या वेळा ज्याप्रमाणें शस्त्रास्त्रांची जय्यत तयारी करावी लागते, त्याप्रमाणें नवीन ज्ञानसंपादनाचे वेळीं मागच्या अभ्यासाची चांगली तयारी ठेवावी लागते. अशी तयारी चांगली असली ह्मणजे ज्ञानार्जनांत प्रतिबंध न येतां विद्यामंदिरामध्यें बुद्धीचा प्रवेश सहज होऊं शकतो. एका ग्रंथकारानें ह्मटलें आहे;

"झालेल्या अभ्यासाच्या उजळणीचा क्रम न ठेवितां जो अभ्यास करील, तो ज्या विद्याप्रदेशांतून जाईल, तो अगदीं धुक्यानें वेष्टित, मार्गरहित, भयाण अरण्याप्रमाणें त्याला आढळेल, आणि पुढें जाण्यास त्याला मार्ग मिळणार नाहीं असें होईल, व मागें फिरेन ह्मणेल तर त्या मार्गावरहि कांहीं खाणाखुणा ठेविल्या नसल्यामुळें तोहि मार्ग दिसणार नाहीं.

असा त्याचा घोंटाळा होऊन मध्येंच कोठें तरी त्यास कुचंबत रहावें लागेल!" ह्यावरून झालेल्या अभ्यासाची वरचेवर उजळणी करून तो तयार ठेवणें किती अगत्याचें आहे, हें उघड आहे.

९ एकाच विषयाचा एकसारखा अभ्यास करून कंटाळा झाला असतां रिकामें न बसतां कांहीं वेळ दुसरा एखादा विषय हातीं घ्यावा. जसें आपण जेवतांना दोन तीन भाताचे घांस घेऊन वीट येऊं लागला ह्मणजे चव येण्याकरितां मध्यें थोडी भाजी, चटणी किंवा कोशिंबीर तोंडीं लावितों किंवा कढीचा ह्मणझणीत भुर्का मारितों, त्याप्रमाणें दुसऱ्या विषयाचा अभ्यास तोंडींलावण्या प्रमाणें करावा. अशा रीतीनें वेळ फुकट जात नाहीं, कंटाळा येत नाहीं व मनास विषय विपर्ययामुळें आनंद होतो. ह्यासाठीं, आलटून पालटून निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करावा, ह्मणजे तेणें करून विषयवैचित्र्यामुळें मनास एक प्रकारची करमणूक होऊन विश्रांतिहि मिळते.

१० किरकोळ वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, नाटकें, कादंबऱ्या, प्रहसनें वगैरे वाचण्याकडे विद्यार्थ्यांची प्रवृत्ति अगदीं बेताची असावी, किंबहुना हीं मुळींच वाचलीं नाहींत तरी चालेल. वर्तमान पत्रें वाचल्या पासून जगांत काय काय उलाढाली चालल्या आहेत त्यांची माहिती होते ही गोष्ट खरी आहे, पण अशा रीतीनें वर्तमान पत्रांतील निरनिराळे विषय वाचून त्यांविषयीं सूक्ष्म विचार करण्याचा नाद विद्यार्थ्यांनीं लावून न घेणें फायदेशीर असतें. कारण, अशा अनवश्यक वाचनापासून त्यांतील विषयांचे विचार मनामध्यें पुनः पुनः उद्भवतात व तेणें करून अभ्यासाकडे मन लागत नाहींसें होतें. शिवाय दुसरें कारण असें कीं, वर्तमान पत्रें व अभ्यासाच्या मर्यादे बाहेरील पुस्तकें वाचिल्यानें स्मरणशक्तीवर विनाकारण ओझें पडतें. स्मरणशक्तीवर विविध विषयांची

गर्दी करून सोडिली तर ती बिचारी थोड्याच काळांत दुर्बल व निरुपयोगी होऊन जाईल ! एक ग्रंथकार ह्मणतो "वर्तमान पत्रांना विद्येच्या शिखरावर बसवून तींच वाचण्यांत वेळ घालवूं नये. शरीराचा निर्वाह होऊन त्यांचें यथास्थित पोषण होण्यास जसें जेवणच पाहिजे, तसें उपयुक्त ज्ञान-प्राप्तीला उत्तम ग्रंथांचेंच परिशीलन करणें अवश्य आहे." यावरून, विद्यार्थ्यांनीं वर्तमानपत्रें व अभ्यासेतर पुस्तकें यांस शिवूंच नये असें ह्मणतां येत नाहीं. आपला अभ्यास संभाळून जगांतील उलाढालींचें अल्पस्वल्प ज्ञान करून घेण्याकरितां त्यांचा स्वीकार करावा.

११ विद्याभ्यास करितांना आणखी एक अतिशय महत्वाची गोष्ट सांगावयाची आहे ती, 'अंगीं लीनपणा असणें' ही होय. आपली बुद्धि कितीहि तीव्र असली, आपला उद्योग कितीहि अचाट असला, तरी विनयावांचून विद्याभ्यास कधींहि व्हावयाचा नाहीं. यासाठीं विद्याभ्यास करित असतांना नेहमीं लीनपणानें वागावें. गर्वानें कोणाचा उपमर्द करूं नये. 'लहान पण देगा देवा। मुंगी साखरेचा ठेवा' हा तुकोबांचा उपदेश ध्यानांत ठेवावा. मुंगी होऊन साखर खाणें बरें, पण हत्ती होऊन लांकडें खाणें नको. आपलीं वडील मनुष्यें अगर शिक्षक अभ्यासावरून किंवा इतर कांहीं कारणावरून जरी प्रसंगविशेषीं कमीज्यास्त बोलले, तरी उलट उत्तर न देतां आपलें कर्तव्य अधिक लक्ष्यपूर्वक करावें. अशा रीतीनें वागलें तरच विद्यामंदिरांत प्रवेश होतो. श्रीकृष्णांनीं अर्जुनाला उपदेश करितांना ह्मटलें आहे:—

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ॥
सर्वंकर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥ १ ॥
तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ॥
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्व-दर्शिनः ॥ २ ॥

या वरून शिक्षकवर्गाची सेवा केल्यावांचून व अंगीं लीनपणा असल्यावांचून विद्याभ्यास व्हावयाचा नाहीं, हें सिद्ध आहे.

१२ विद्याभ्यास करित असतां विद्यार्थ्यांस कित्येक बऱ्या-वाईट संवयी साहजिकपणें लागत असतात. वाईट संवयीं पासून कधींहि हित व्हावयाचें नाहीं. चांगल्या संवयी मुख्यो-द्देशाला वारंवार प्रोत्साहन देऊन मनास प्रगल्भता आणून देत असतात. या साठीं नेहमीं चांगल्या संवयींचें दृढीकरण करावें.

आतां प्रत्येकानें कोणत्या व कशा संवयी लावून घ्याव्या या विषयीं विवरण करावयाचें ह्मटलें तर फार विस्तार होईल, या साठीं चांगल्या संवयींचें दिग्दर्शन करणें उचित आहे.

१ दररोज काय करावयाचें त्याविषयीं आदल्या दिवशी संकेत करून ठेवावा.

२ मनोनिग्रह– आत्मसंयमना–ची संवय असावी.

३ जो मनुष्य भेटेल त्याजपासून कांहीं तरी उपदेश किंवा समजूत करून घ्यावी. अशा रीतीनें ज्ञानांत भर पडते.

४ आपणास जें कांहीं करावयाचें असेल त्याविषयीं पूर्वी पूर्ण विचार करून ठेवावा.

५ आपली मुद्रा नेहमीं सुप्रसन्न असावी, हिरमुसलेलें तोंड असूं नये. लॉर्ड बेकन् ह्मणतो कीं, " सुंदर मुद्रा ही एक सर्व-काळ असणारें शिफारस पत्रच होय ! "

६ बोलण्यामध्यें कोणतीहि खोड नसावी.

७ मित्रमंडळीशीं प्रेमानें व सभ्यपणें वागावें.

वरील संवयी विद्यार्थ्यांचे अंगीं असणें अगदीं जरूर आहे. ह्या संवयी अभ्यासानें सहज प्राप्त होतात. यांशिवाय 'विद्या-र्थ्यांचें वर्तन' कसें असावें, हा एक महत्वाचा भाग आहे; त्याचें विवरण पुढील प्रकरणांत करणें प्रशस्त होय.

प्रकरण ५ वें.

विद्यार्थ्यांचें वर्तन.

" धर्मार्थौ यत्र न स्यातां शुश्रूषा वापि तद्विधा ॥
तत्र विद्या न वक्तव्या शुभं बीजमिवोषरे ॥ १ ॥

मनुस्मृति.

" विद्यया सार्धं म्रियेत न विद्यामूषरे वपेत् "

छांदोग्य ब्राह्मण.

ह्या भागामध्यें विद्यार्थ्यांच्या वर्तनाविषयीं विशेष विचार करावयाचा आहे. प्राचीन शिक्षणपद्धतीमध्यें व अर्वाचीन शिक्षण क्रममाध्यें अतिशय फरक पडला आहे, हें मागें एकदा सांगितलेंच आहे. शिक्षणपद्धति कशीहि असली तरी शिक्षक व शिष्य हें नातें आहेच. गुरुजींची सेवा करून त्यांस संतोषित ठेवणें व सदाचरणानें वागून निरंतर अध्ययन करणें हेंच विद्यार्थ्याचें मुख्य कर्तव्य आहे. ह्या कर्तव्याप्रमाणें वागणाऱ्या विद्यार्थ्यालाच विद्याग्रहणाची पात्रता येते. मनुस्मृतींत ह्मटलें आहे:—

विद्ययैव समं कामं कर्तव्यं ब्रह्मवादिना ॥
आपद्यपि हि घोरायां न त्वेनामिरिणे वपेत् ॥ १॥

खडकावर पेरिलेलें बीं जसें निरुपयोगी होतें, तसें मूर्ख शिष्याला पढविणें निरर्थक असतें. यासाठीं, विद्यार्थ्यांच्या अंगीं विद्याग्रहणपात्रता असली पाहिजे. ' वर्तन ' हा ' संस्कारांचा ' परिणाम आहे. मनावर जसे बरेवाईट संस्कार होतात, त्याप्रमाणें मनुष्याचें वर्तन असतें. मन सुसंस्कृत करणें हा विद्याभ्यासाचा मुख्य उद्देश आहे. यास्तव, कशा रीतीनें

वर्तन केलें असतां मन सुसंस्कृत होऊन विद्याग्रहणपात्रता येते, ह्याचा विचार करणें अवश्य आहे.

(१)परमेश्वरभक्ति–जगामध्यें कित्येक गोष्टी अशा असतात कीं, मनुष्यानें त्यांचें उल्लंघन कधींहि करूं नये. उदाहरणार्थ–परमेश्वराची भक्ति करणें. ज्या जगन्नियंत्या परमेश्वरानें आपणास अतिमूल्यवान् मनुष्यजन्म दिला व अगदीं लहानपणापासून आपलें संरक्षण केलें, ज्याच्या कृपाप्रसादानें आपणास ज्ञानामृतपानाची सुसंधि प्राप्त झाली आहे, आणि ज्याच्या प्रेममयकटाक्षरूपी नौकेच्या साह्यानें आपणास बहुविध विपत्तिरूप खडकांनीं व्याप्त असा हा विस्तीर्ण संसारसागर सुखरूप तरून जावयाचें आहे, व शेवटीं अविनाशी, सर्वव्यापी व प्रकाशमय तत्वाची प्राप्ति करून घ्यावयाची आहे, त्या जगच्चालकाची निरंतर सेवा करणें, आपल्या वर्तमान स्थितीबद्दल त्याचे आभार मानणें आणि आपल्या एकनिष्ठेनें त्यास सुप्रसन्न करणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे. संसारांतील सुखदुःखें हीं पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें क्षणभंगुर असतात. परंतु शाश्वत सुखाची गोष्ट तशी नाहीं. तें चिरकालिक व आनंदमय आहे! असलें अद्वितीय सुख ईश्वरनिष्ठेवांचून व धर्माचरणावांचून प्राप्त व्हावयाचें नाहीं. महाभारतांतील आदिपर्वाच्या दुसऱ्या अध्यायांत ह्मटलें आहेः

> धर्मे मतिर्भवतु वः सततोत्थितानां । सह्येक एव पर-
> लोकगतस्य बंधुः ॥ अर्थाः स्त्रियश्च निपुणैरपि से-
> व्यमाना । नैवाप्तभावमुपयान्ति न च स्थिरत्वम् ॥१॥

या श्लोकाचा भावार्थ वर आलाच आहे. ह्या चिन्मय सुखाच्या प्राप्तीसाठीं मुनिजन तपश्चर्या करित असतात, योगी

लोक योगाभ्यासामध्यें तल्लीन असतात व तुकारामासारखे साधु लोक भजनरंगीं रंगून जातात ! खरोखर परमेश्वराची भक्ति करण्यामध्यें जें अप्रतिम सौख्य, समाधान, शांति व आनंद आहे तो अवर्णनीय आहे ! अनुभवाशिवाय ह्या सुखाची वास्तविक योग्यता कळावयाची नाहीं. ह्या सुखाची ज्यांस गोडी लागली त्यांस संसारांतील नानाविध क्लेशांचा वीट येऊन त्यांची वृत्ति तुकोबांनीं ह्मटल्याप्रमाणें–

ब्रह्मानंदीं लागली टाळी । कोण देहातें सांभाळी ॥

अशी व्हावयाची ! प्रिय विद्यार्थी जन हो, जरी हें सौख्य अति उत्तम असलें तरी त्याची सध्यां हांव करूं नका. कारण आपणांस पायरीपायरीनें गेलें पाहिजे. जिना चढतांना एकेक पायरी चढून जाणें सोइस्कर व सुखकर असतें. एकदम दोन चार पायऱ्या ओलांडून जाण्याचें धाडस केलें तर तोंडघशींच पडण्याची पाळी यावयाची ! अध्यात्म रामायणांत असेंच प्रतिपादन केलें आहेः–

आदौ स्ववर्णाश्रमवर्णिताः क्रियाः । कृत्वा समासादितशुद्धमानसः ॥ समाप्य तत्पूर्वमुपात्तसाधनः । समाश्रयेत्सद्गुरुमात्मलब्धये ॥ १ ॥

याचा भावार्थ उघडच आहे. ही संसार यात्रा आपणांस क्रमाक्रमानें केली पाहिजे,प्रथम आपल्या वर्णाला व आश्रमाला अनुरूप अशीं कर्तव्यें करावीं, ह्मणजे तेणें करून अंतःकरण शुद्ध होतें. चित्तशुद्धि झाल्यावर परमार्थसाधनाची तयारी करून आत्मज्ञानप्राप्ती करितां सद्गुरुला शरण जावें. असो.

परमेश्वरावर ज्याची पूर्ण निष्ठा आहे, ईश्वरभक्ति हेंच ज्याचें ब्रीद आहे, त्याला परमेश्वर कधींहि अंतर देणार नाहीं! गजेंद्राचा धांवा ऐकून

॥ लगबग बहु झाली वस्त्रही सांवरे ना ॥

अशी ज्या सर्वेश्वराची गडबड उडाली, त्याचें भक्तप्रेम किती अवर्णनीय आहे बरें? ज्याच्या विपरीत नामोच्चरणाच्या प्रतापानें 'वाल्या कोळ्या' चा 'वाल्मीकि आदिकवि' झाला; त्याच्या यशाचें वर्णन आपणास कसें करितां येईल? द्रौपदीच्या हांका ऐकतांच जो द्वारकेहून धांपा टाकित आला, त्या श्रीकृष्णपरमात्म्याला आपल्या भक्तांची किती काळजी वाटत असावी बरें? प्रियभक्त प्रल्हादाचें संरक्षण करण्याकरितां ज्यानें नारसिंहावतार धारण केला त्याची भक्तप्रीति किती ह्मणून सांगावी! अशी दृढभक्ति आपण कां करूं नये? भक्तिविजयामध्यें व संतलीलामृतामध्यें अनेक हीन जातीच्या लोकांचा उद्धार केवळ भक्तिमार्गानें झाला असें आपण वाचितों ना? मग आपण परमेश्वराची तशी एकनिष्ठ भक्ति केली तर तो आपणावर प्रसन्न होणार नाहीं काय? ज्यानें एकनाथाच्या घरीं कावडीनें पाणी भरिलें, ज्यानें दामाजी पंताच्या संरक्षणासाठीं महाराचें सोंग घेऊन अविंधांच्या दरबारीं द्रव्याची फेड केली, त्याची भक्तांविषयीं कळकळ किती वर्णन करावी? खरोखर थोर भाग्य त्या भक्तवर्यांचें कीं ज्यांच्या साठीं सर्वेश्वर प्रभूला प्रयास सोसावे लागले! सारांश आपण परमेश्वरावर पूर्ण निष्ठा ठेवावी; सकाळ संध्याकाळ त्याचें नामस्मरण करून अनन्य भावानें शरण जावें व आपलीं सर्व कर्तव्यें योग्य रीतीनें बजाविण्यास सामर्थ्य व उत्साह देण्याबद्दल प्रार्थना करावी.

(२) सदाचरण—आपल्या मातापितरांस, शिक्षकांस तसेंच कुटुंबांतील व समाजांतील श्रेष्ठ माणसांस मान देणें व त्यांच्या आज्ञेप्रमाणें वागणें मुलांना अत्यंत हितकर असतें. आपले शिक्षक व वडील माणसें आपलें कल्याण

व्हावें ह्मणूनच आपणास वारंवार उपदेश करित असतात. त्यांच्या उपदेशाप्रमाणें वागण्यामध्यें आपलें हित आहे, हें नेहमीं लक्ष्यांत ठेवावें. आपणापेक्षां मोठ्या माणसांना जगांतील निरनिराळे अनुभव आलेले असतात, यासाठीं त्यांच्या अनुभवांचा फायदा घेऊन आपण वागण्याचा क्रम ठेविला तर तो आपणास खचित यशस्कर झाल्यावांचून राहणार नाहीं. नेहमीं वडील मनुष्यांविषयीं मनांत आदरबुद्धि बाळगिणें अवश्य आहे. कित्येक मुलें आचरटपणानें वडिल मनुष्यांचें व शिक्षकांचें सांगितलेलें ऐकत नाहींत. पण शेवटीं त्याचा परिणाम दुःसह होऊन तो भोगण्याचा प्रसंग आला ह्मणजे त्यांच्या उपदेशाचें स्मरण होतें व मग कोठें डोळे उघडतात! मनुष्याला आपल्या दुर्वर्तनाचा पश्चात्ताप होऊन पाहिजे तेव्हां चुकीची दुरुस्ती करितां येते. इंग्लिश भाषेंत एक ह्मण आहे कीं, " It is never too late to mend " ह्मणजे, चुकीची दुरुस्ती करण्याचें मनुष्यानें मनांत आणिलें तर ती केव्हांहि होऊं शकते. पुष्कळ मुलांच्या नैतिक वर्तनासंबंधें बऱ्याच चुका होतात व त्या, पुढें त्यांस जाचक होतात, यासाठीं प्रिय विद्यार्थी जनहो, आपल्या वडील मनुष्यांच्या व शिक्षकांच्या अनुमोदनावांचून कोणत्याहि बिकट कृत्यास हात घालूं नका. आपल्या वडील मनुष्यांच्या व शिक्षकांच्या आज्ञेंत राहणें फार श्रेयस्कर आहे. आजपर्यंत जे जे मोठे प्रसिद्ध पुरुष होऊन गेले त्यांचीं चरित्रें वाचिलीं असतां आज्ञाधारकपणा हा गुण त्यांतील बहुतेकांच्या अंगीं वास करित होता असें आपणास आढळून येईल.

आपणास जगांत चांगलें नांव मिळविण्याची उत्कट इच्छा असावी. दुष्कृत्यांनीं प्रसिद्ध असण्यापेक्षां मुळींच अप्रसिद्ध असावें हें चांगलें. मनुष्य सर्वमान्य होण्यास त्याचे अंगीं

सौजन्य पाहिजे. मग तो गरीब स्थितींत कां असेना! आपण हें लक्ष्यांत ठेवणें जरूर आहे कीं, गरीबी किंवा श्रीमंती जन्मापासून असणें ह्यांत आपला कांहीं दोष किंवा विशेष भूषण आहे असें नाहीं. पण एवढी गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे कीं, जो मनुष्य ईश्वरनिष्ठ, सदाचरणी, उद्योगी व नियमितपणें वागणारा आहे, तो दारिद्र्यजालांतून लौकरच निष्क्रमण करूं शकतो. इतकेंहि करून कांहीं आकस्मिक कारणांमुळें किंवा परिस्थितीच्या असमर्थतेमुळें दारिद्र्य आपणास सोडितच नाहीं असें वाटलें तर त्यास न भितां तसेच प्रयत्न चालू ठेवावे. आकस्मिक संकटांना भिऊं नये. याविषयीं सुप्रसिद्ध भारवी कवीनें ह्मटलें आहे.

पैरपर्यासितवीर्य–संपदां पराभवोऽप्युत्सव एव मानिनाम् ॥

भावार्थ–जे मानी पुरुष असतात ते आकस्मिक संकटांना मुळींच भीत नाहींत, तर त्यांच्याशीं झगडण्यांत त्यांस मोठा आनंद व उत्साह वाटतो. त्यांच्या धैर्याचें व वीर्याचें कोणी मानवी शत्रूनें हरण केलें नसल्यामुळें ते त्या संकटांशीं नेटानें लगट करितात व अखेरीस विजयी होतात. असो.

न्यायासनावर बसून न्याय करण्याचें काम असो किंवा काबाडकष्ट करून मजुरी करण्याचें काम असो, उद्योगधंदा कांहीं न करितां मजेनें कालक्षेप करण्याचें सामर्थ्य असो अथवा कोणाची चाकरी करण्याचें काम असो, प्रत्येक मनुष्यानें नीतीनें वागावें. अनीतीनें वागून आपला उत्कर्ष व्हावा अशी घमेंड बाळगणाऱ्या मनुष्याचा उद्देश कधींहि सिद्धीस जावयाचा नाहीं. अशा मनुष्याची आरंभीं कदाचित् भरभराट होईल परंतु परिणामीं त्याचे हाल कुत्राहि खाणार नाहीं!

संसारामध्यें अनेक विपत्ति यावयाच्याच. घाव सोसल्यावांचून देवकळा जशी प्राप्त होत नाहीं, त्याप्रमाणें विपत्ति भोगल्यावांचून सुख मिळावयाचें नाहीं. आपणास सुखदुःख प्राप्त होणें मुख्यतः आपल्या वर्तनावर अवलंबून असतें. तसेंच, मोठ्या योग्यतेला चढणें किंवा हीन दशेला जाणें आपल्या हातीं असतें. हितोपदेशांत म्हटलें आहे,

लोके गुरुत्वं विपरीततां वा । स्वचेष्टितान्येव नरं नयन्ति ॥

याचा अर्थ उघडच आहे. आपणास मोठेपणा प्राप्त व्हावा असें वाटत असेल तर स्वतः कमर बांधिली पाहिजे. इतर लोकांच्या मदतीच्या आशेवर फारसें अवलंबून असणें उपयोगी नाहीं. सुप्रसिद्ध भारवी कवीचेंहि असेंच मत आहे. तो म्हणतोः–

अभिमानवतो मनस्विनः प्रियमुच्चैः पदमारुरुक्षतः॥
विनिपातनिवर्तनक्षमं मतमालंबनमात्मपौरुषम् ॥ १ ॥

भावार्थः–अभिमानी, आपत्कालीं न घाबरतां शांतपणें विचार करून विपद्विमुक्त होण्याचा दीर्घप्रयत्न करणारा, श्रेष्ठपदप्राप्ति होऊं इच्छिणारा असा जो पुरुष असेल, त्यानें निरंतर हें लक्ष्यांत वागवावयास पाहिजे कीं, संकटांचें निवारण करण्यास समर्थ व स्वोद्देशसिद्धिकारक असें ‘ स्वावलंबन’च होय. ’ यावरून स्वावलंबन हें उत्कर्षाचें मूळ आहे हें उघड आहे. कोणताहि इतिहास शोधून पाहिला तरी स्वावलंबनानें अनेक राष्ट्रें ऊर्जितावस्थेस आलीं असें स्पष्ट दिसून येईल. परंतु ‘ घालगे बाई जोगवा ’ अशी मागणी करून कोणतेंहि राष्ट्र ऊर्जितावस्थेस आल्याचें उदाहरण इतिहासांत एकहि सांपडावयाचें नाहीं. सारांश, लहानपणापासून स्वावलंबनाची संवय असावी.

कोणतेंहि काम विचार केल्याशिवाय करूं नये. अविचारानें वर्तन केलं असतां अनेक संकटें उद्भवतात. अविचारानें व उतावळेपणानें कोणतेंहि काम नीटपणें व्हावयाचें नाहीं. यासाठीं, प्रत्येक कृत्याचा नीट विचार करावा. याविषयीं भारवीनें ह्मटलें आहे:–

सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदम् ॥
वृणुते हि विमृश्यकारिणं गुणलुब्धाः स्वयमेव संपदः ॥१॥

भावार्थ–कोणतेंहि काम विचार केल्याशिवाय करूं नये. कारण, अविचार हें महत्संकटांचें कारण आहे. जो मनुष्य विचार करून कोणतेंहि काम करितो त्याला संपत्ति सहज प्राप्त होते. यास्तव, प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करावी.

वरील विवेचनावरून सदाचरणानें वागणें किती इष्ट आहे? सदाचरणामध्यें अंतर्भूत असणाऱ्या सत्य, परोपकार, धैर्य, सारासार विवेक, सौजन्य इत्यादि अनेक सद्गुणांना अनुसरून वागणें किती यशस्कर आहे, हें उघड आहे. मुलांनीं शाळेंत व घरीं सदाचरणानें वागावें. घरीं असतांना खरें बोलणें, वडिलांना मान देणें व त्यांची आज्ञा शिरसा मान्य करणें आणि शाळेंत दिलेले धडे लक्ष्य पूर्वक करणें हें मुलांचें कर्तव्य आहे. कोणाशीं भांडण तंटा करूं नये; चोरी चहाडी करूं नये; शिव्यागाळी करूं नये; व आपल्या कामाचा कधीं कंटाळा करूं नये. एवढें केलें ह्मणजे मुलांचा वर्तनक्रम योग्यरीतीचा आहे असें ह्मणतां येईल. आतां शाळेंत वर्तन कसें असावें ह्याचा थोडा विचार करूं. मराठी पांचव्या पुस्तकांत सांगितलेंच आहे कीं,

माता दैवत पहिलें मानीं तूं तात तेंविही देव ॥
गुरु अतिथि तत्समानचि मानुनि तूं पूज्यभावना ठेव ॥

घरीं असतांना आई हें जसें मुलांचें दैवत आहे, त्याप्रमाणेंच शाळेंत शिक्षकांना मान दिला पाहिजे. आपल्या परमपूज्य गुरुजींशीं नम्रतेनें वागावें, त्यांचा आज्ञाभंग करूं नये व त्यांनीं नेमून दिलेले धडे झटून लक्ष्यपूर्वक तयार करावे आणि त्यांस संतुष्ट करावें यांतच विद्यार्थ्यांचें कल्याण आहे. तसेंच, शाळेंतील इतर समवयस्क मुलांशीं प्रेमानें वागावें; परस्परांस होईल तितकी मदत करावी; व कोणास त्रास देऊं नये. सर्वच विद्यार्थी ह्मणजे हुषार व तरतरीत असतात असें नाहीं. तेव्हां आपणास जें येईल तें इतरांस मोकळ्या मनानें व नीट समजाऊन सांगावें. याप्रमाणें शाळेंत वर्तन असलें ह्मणजे कोणीहि विद्यार्थी सर्वप्रिय होतो. हा वर्तनक्रम लहान मुलांसच लागू आहे असें नाहीं. लहान मोठ्या सर्व विद्यार्थ्यांनीं अशा प्रकारचें वर्तन ठेविल्यास खचित त्यांचें कल्याण होईल !

मनुष्याला आपली ऐहिक व पारलौकिक उन्नति व्हावी असें निरंतर वाटत असावें. ऐहिक उन्नति ह्मणजे आपल्या कुटुंबाचें चांगल्या रीतीनें संरक्षण करून होईल तितका परोपकार करण्याची वृत्ति. आपल्या मुलांबाळांच व वडील मनुष्यांचें पालन करण्याची जबाबदारी आपणावर असते. ही जबाबदारी ओळखून आपल्या अंगीं कुटुंबाचें संरक्षण करण्याची शक्ति आणण्याचा लहानपणा पासून प्रयत्न करावा. ईश्वरकृपेनें अनुकूल परिस्थिति असली, कुटुंब संरक्षणाची काळजी नसली–ह्मणजे परोपकार करण्यास पुष्कळ सवड सांपडते. पण जर कां मनुष्य ‘ जीवनसंग्रामा ’ च्या कचाट्यांत सांपडला तर त्याला ‘ दे माय धरणी ठाय ’ असें होतें. अशा स्थितींत परोपकार कसा होणार ? परंतु हिंमत सोडूं नये. सदाचरणानें वागून अब्रूनें दिवस काढावे. अब्रू कांचे

सारखी आहे. कांच एकदां फुटल्यावर जशी पुन्हा नीट होत नाही, तशी एकदां अब्रू गेली ह्मणजे ती परत मिळत नाहीं. यासाठीं, नेहमीं सदाचरणानें वागावें ह्मणजे कीर्ति व संपत्ति प्राप्त होते. सदाचरणाविषयीं मनुस्मृतींत ह्मटलें आहेः-

दुराचारो हि पुरुषो लोके भवति निंदितः ॥
दुःखभागी च सततं व्याधितोऽल्पायुरेव च ॥ १ ॥
सर्वलक्षणहीनोऽपि यः सदाचारवान्नरः ॥
श्रद्दधानोऽनसूयश्च शतं वर्षाणि जीवति ॥ २ ॥
अधार्मिको नरो यो हि यस्य चाप्यनृतं धनम् ॥
हिंसारतश्च यो नित्यं नेहासौ सुखमेधते ॥ ३ ॥
नाधर्मश्चरितो लोके सद्यः फलति गौरिव ॥
शनैरावर्तमानस्तु कर्तुर्मूलानि कृंतति ॥ ४ ॥
अधर्मेणैधते तावत्ततो भद्राणि पश्यति ॥
ततः सपत्नाञ्जयति समूलस्तु विनश्यति ॥ ५ ॥
अनभ्यासेन वेदानामाचारस्य च वर्जनात् ॥
आलस्यादन्नदोषाच्च मृत्युर्विप्राञ्जिघांसति ॥ ६ ॥

तसेंच सदाचरणाविषयीं आश्वलायनस्मृतीच्या दहाव्या अध्यायांत प्रतिपादन केलें आहेः-

सदाचारपरो नित्यमुभयत्र विराजते ॥
सदाचारविहीनत्वान्न भवंति शतायुषः ।
संतोऽपि मानवाः सर्वे प्रायो भारतभूमिजाः ॥ १ ॥
सदाचारविहीनस्तु सर्वज्ञोऽप्यप्रियो नरः ।
सर्वलोकस्य भवति नात्र कार्या विचारणा ॥ २ ॥
सर्वलक्षणहीनोऽपि सदाचारपरः शुभः ॥
राजते मोदते सर्वैः स्तूयते ऽमुत्र चेह च ॥ ३ ॥
श्रियमायुर्यशो वर्चः प्रजाः पशुवसूनि च ॥
सर्वसंवननं मर्त्यः सदाचारपरो लभेत् ॥ ४ ॥

प्रायो नाकस्य मोक्षस्य सुखस्यच महात्मनाम् ॥
शौचं शारीरमुद्दिष्टं सदाचारवतां नृणाम् ॥ ५ ॥

ह्यावरून सदाचरणानें वागल्यापासून ह्या लोकीं व परलोकीं किती उत्तम सौख्य प्राप्त होतें हें उघड आहे. ज्याला आपल्या जन्माचें सार्थक व्हावें असें वाटत असेल त्यानें नेहमीं सदाचरणानें वागावें. दुराचारानें प्राप्त होणारें सौख्य अस्थिर व दुःखपर्यवसायी असतें. यासाठीं, सर्वांनीं सदाचरणानें वागावें व आपली जीवनयात्रा सुखावह करावी हें उचित होय.

(३) नियमितपणा—जगांतील प्राणिमात्राची अशी उत्कट इच्छा असते कीं आपणास निरन्तर सुख मिळावें. मनुष्यप्राणीच सुखासाठीं हापापलेला असतो असें नाहीं. आपण नेहमीं पाहतों कीं, वृक्षलतांचाहि सुखप्राप्तीचा उद्योग सतत चालू असतो. मात्र तो आपल्या दृष्टोत्पत्तीस सहज येत नाहीं. आपणास दुःख प्राप्त व्हावें अशी तर कोणाचीच इच्छा नसते. परंतु जगांतील दुःख कमी झालेलें मुळींच आढळत नाहीं. उलटपक्षीं,

सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वता एवढें ॥

असा प्रकार चोहोंकडे आढळतो! याचें कारण काय? या प्रश्नाचें उत्तर देणें विशेष अवघड आहे असें नाहीं. थोडा विचार केला तर आपणास असें दिसून येईल कीं, जसजसें सद्गुणांचें सान्निध्य ज्यास्त तसतसें सुखाचें प्रमाण वाढत असतें. ज्याच्या अंगीं सर्व सद्गुणांचें वास्तव्य आहे, तो केवळ एक ईश्वरच होय! परंतु मनुष्यानें शक्यतें प्रयत्न करून सद्गुणी होणें त्याच्या स्वाधीनचें आहे. अर्थात् ज्याच्या अंगीं सद्गुण तो खरा सुखी असें ह्मणतां येईल.

ज्या सद्गुणांच्या योगानें सौख्यप्राप्ति होते त्यांपैकीं 'नियमितपणा' हा एक होय. मागें 'सदाचरणा' विषयीं लिहितांना नियमितपणासंबंधीं मुळींच विचार न करितां स्वतंत्र रीतीनें त्याचा उहापोह करण्याचें प्रयोजन इतकेंच कीं, आपल्या समाजाला ह्या सद्गुणाची चांगलीशी ओळख नाहीं! पूर्वीपासून आपल्या समाजांत ह्या गुणाचा बराच अभाव आहे. बरें सुधारलेल्या लोकांच्या सहवासानें ह्या गुणाची अभिवृद्धी होईल असें ह्मटलें तर अलीकडे हाही समज चुकीचाच ठरत चालला आहे! मुंबई सारख्या ठिकाणीं शेंकडों युरोपियन लोक ट्रम, आगगाडी, बायसिकल, व्हिक्टोरिया या मधून प्रवास करित असले तरी त्यांचा कांहीना कांहीं तरी लेखन वाचनाचा उद्योग चाललेला असतो असें दिसतें! पण आमच्या समाजांत ह्या सद्गुणाचें फारसें अस्तित्व नाहीं असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें! व्यवहारांत तर या सद्गुणाची फार आवश्यकता आहे; यासाठीं, प्रस्तुत विषयाचा विशेष विचार करणें जरूर आहे. इंग्लिश भाषेंत एक ह्मण आहे कीं, 'Every thing has its turn i.e. things are to be done by turns' याचा अर्थ असा कीं, प्रत्येक काम आळी पाळीनें करावयाचें असतें. कोणतेंहि एकच काम फार वेळ करित बसल्यानें त्याचा वीट येऊन तें नीट होत नाहीं! यासाठीं, सर्व कृत्यें आळी पाळीनें करावीं. विश्रांति घेणें ह्याचा अर्थ असाच कीं एक काम ठेवून देऊन दुसरें काम हातीं घेणें. कोणीहि मनुष्य अगदीं रिकामा असा कधींच नसतो. गीतेंत ह्मटलें आहे:—

नहि कश्चीत्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ॥

अर्थात् मनुष्याचा निरंतर कांहींना कांहीं तरी उद्योग चाललेलाच असतो. पण तो उद्योग नियमितपणें केला तरच हितकर होतो. नाहीं पेक्षां त्यापासून उलटा त्रास होतो.

मुख्यतः भोजन, व्यायाम, श्रम आणि वेळ यांमध्यें नियमितपणा असावा. आपल्या पचनशक्ती पेक्षां कमी अगर ज्यास्ती अन्न भक्षण केलें तर प्रकृति बिघडते. योग्य रीतीनें व नियमितपणें व्यायाम केला नाहीं तर आरोग्याची हानि होते मुळींच श्रम केले नाहीं तर उपाशीं राहण्याची पाळी येते. शक्तीबाहेर अतिशय श्रम केले तर अंथरुण धरून बसण्याचा प्रसंग यतो. काळाचा व्यय नियमितपणें केला नाहीं तर सर्व कामें अर्धवट राहून " एक धडना भाराभर चिंध्या " असा प्रकार होतो. पैसा नियमितपणें खर्च केला नाहीं तर हातीं चौपदरी घ्यावी लागते! यावरून व्यवहारांत, नियमितपणा, किती अवश्य आहे, हें स्पष्ट दिसून येईल.

बेंजामिन् फ्रांक्लिन आपल्या वेळापत्रका प्रमाणें नेहमीं वागत असे. जार्ज वॉशिंग्टनची नियमितपणा संबंधें ख्याति आहे. आपल्या समाजांत नियमितपणाची कोणासच ओळख नव्हती असें सुतराम् ह्मणतां यावयाचें नाहीं. कारण, महाकवि भारवीनें किरातार्जुनीयांत दुर्योधनाविषयीं ह्मटलें आहे:—

विभज्य नक्तंदिवमस्ततंद्रिणा
वितन्यते तेन नयेन पौरुषम् ॥

यावरून नियमितपणानें वागण्याची संवय आमच्या समजांत बऱ्याच प्राचीन काळीं होती असें ह्मणण्यास आधार आहे. पण अलीकडे नाना फडणवीस, कै० रावसाहेब मंडलीक यां सारखीं नियमितपणें वागणारीं नररत्नें फारशीं प्रकाशमान होत नाहींत हो गोष्ट खरी आहे!

अनियमितपणामुळें कोणतेंहि कार्य सिद्धीस जावयाचें नाहीं. आगगाडींत बसण्यास किंवा आगबोटीवर चढण्यास पांच मिनिटें उशीर झाला तर ती वेळ पुनः साधावयाची

नाहीं. यासाठीं, लहानपणापासून नियमितपणानें वागण्याची संवय ठेवावी. आरंभीं नियमितपणें वागणें कित्येकांस जड जाईल. पण सतत परिश्रम केल्यास नियमितपणाचा बाऊ मुळींच वाटावयाचा नाहीं. व्यवहारांत या गुणाची फार आवश्यकता असल्यामुळें हा साध्य करून घेणें इष्ट आहे.

प्रकरण ६ वें.

विद्यार्थी आश्रमाचें महत्व.

" हर्तुर्याति न गोचरं किमपि शं पुष्णाति यत्सर्वदा-
प्यर्थिभ्यः प्रतिपाद्यमानमनिशं प्राप्नोति वृद्धिं पराम् ॥
कल्पान्तेष्वपि न प्रयाति निधनं विद्याख्यमंतर्धनम्
येषां तान्प्रति मानमुज्झत नृपाः कस्तैः सह स्पर्धते॥ १॥ "

भर्तृहरि.

मागें दुसऱ्या प्रकरणांत ब्रह्मचर्याश्रमासंबंधीं विचार करितांना असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, हल्लीं ब्रह्मचर्याश्रमाचे धर्म केवळ नामशेष होऊन राहिले आहेत, ब्रह्मचर्याश्रमाचें अस्तित्व अगदीं क्वचितच आहे व केवळ ब्रह्मचर्याश्रमाला अनुसरून वागणें सांप्रतच्या जनस्थितींत शक्य नाहीं. तेव्हां प्रथमाश्रमाचें ' ब्रह्मचर्याश्रम ' हें नांव बदलून त्याच्या जागीं ' विद्यार्थी आश्रम ' असें ह्मणण्यास कांहीं विशेष हरकत येईल असें वाटत नाहीं. असो.

आपल्या भरतखंडाचा पूर्वेतिहास पाहिला असतां राजे लोकांचें अमर्याद ऐश्वर्य, ब्राह्मणादि वर्णांचें स्वकर्मनिरतत्व, विद्यादेवीचें अखंड वास्तव्य, कलाकौशल्याचें अत्यंत मोह-

कल्व इत्यादि अनेक गोष्टी डोळ्यांपुढें मूर्तिमंत येऊन उभ्या राहतात! पण अलीकडच्या स्थितीचें सूक्ष्मदृष्टीनें अवलोकन केलें तर आपले डोळे पाण्यानें भरून येतात, कंठ गहिंवरून येतो व कालशक्तीपुढें कोणाचा इलाज नाहीं असा विचार पुढें येऊन मन उद्विग्न झाल्यावांचून राहत नाहीं! हा भयंकर ऱ्हास, हें विलक्षण स्थित्यंतर, ही उद्वेगजनक अवदशा होण्याचीं कारणें अनेक आहेत. त्यांमध्यें ‘ वर्णाश्रमधर्माचा लोप ’ हें एक प्रमुख कारण आहे, ह्याविषयीं कोणाचा मतभेद होणें शक्य नाहीं. ज्या आर्यभूमीमध्यें पूर्वीं एका काळीं वर्णाश्रमधर्म जागृत होते त्याच ठिकाणीं आतां वर्णाश्रमधर्म लुप्तप्राय होऊं पहात आहेत! चतुर्वर्णांमध्यें विलक्षण घोंटाळे उपस्थित झाले आहेत, अठरापगड जाति आपापल्या सुधारणेचे घोडें पुढें पुढें लोटित आहेत, बिचाऱ्या आश्रमांना तर कोणीच विचारीनासा झाल्यामुळें व त्यांच्याकडे कोणी ढुंकूनहि पाहत नसल्यामुळें ते बापडे कसा तरी जीव धरून आहेत! शिव शिव! काय हें विलक्षण स्थित्यंतर ! बा आर्यावर्ता, तुझे ते प्राचीन सहवासी वर्ण आणि आश्रम तुला पूर्वीच्या स्थितींत असल्याप्रमाणें पुन्हा भेटणें निदान सांप्रत तरी शक्य दिसत नाहीं !

प्राचीन काळापासून आपला हिंदुस्तानदेश लक्ष्मी आणि सरस्वति यांचें आदिपीठ होऊन बसला होता; पण कालिदासानें ह्मटल्याप्रमाणें,

> कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा ॥
> नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण ॥

हा सर्वव्यापी सिद्धांतरूप ग्रह, ह्या देशाच्या राशीस आला आहे व त्याचे इष्टानिष्ट परिणाम आपण भोगित आहोंत !

जरी आपल्या स्थितीमध्यें जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे, जरी आपली ज्ञानप्रभा अस्तंगत होऊं पहात आहे, तरी आपल्या कर्तृत्वशक्तीचा योग्य उपयोग करून घेणं आपल्या हातीं बरेंच आहे. विद्यादेवीच्या निःसीम आराधनेचें फल अल्प नाहीं. विद्यादेवतेचा प्रसाद ज्याला प्राप्त झाला, त्याला काय कमी आहे? विद्येविषयीं एका सुभाषितकारानें ह्मटलें आहेः–

मातेव रक्षति पीतेव हिते नियुंक्ते । कांतेव चापि रमयत्यपनीय खेदम् ॥ लक्ष्मीं तनोति वितनोति च दिक्षु कीर्त्तिम् । किं किं न साधयति कल्पलतेव विद्या ॥ १ ॥

आईप्रमाणें रक्षण करणारी, बापाप्रमाणें हितयोजना करणारी, मनाचा खेद नाहींसा करून भार्येप्रमाणें रमविणारी, धनवृद्धि करणारी, दिगंतकीर्ति पसरविणारी अशी विद्या कल्पवृक्षाप्रमाणें कोणताहि मनोरथ सहज पूर्ण करूं शकते! एवढेंच नव्हे, विद्येचें खरें श्रेष्ठत्व पुढील श्लोकांत स्पष्टपणें दाखविलें आहेः–

विद्या नाम नरस्य रूपमधिकं प्रच्छन्नगुप्तं धनम् ।
विद्या भोगकरी यशः सुख-करी विद्या गुरूणां गुरुः ॥
विद्या बंधुनो विदेशगमने विद्या परा देवता ।
विद्या राजसु पूजिता न तु धनं विद्याविहीनः पशुः ॥१॥

अहाहा, केवढा तरी हा विद्येचा महिमा! कल्पवृक्षापेक्षांहि विद्येची योग्यता अधिक आहे. कारण, आपले मनोरथ कल्पवृक्षाच्या छायेखालीं बसावें तेव्हांच पूर्ण होतात. अर्थात् कल्पवृक्षाच्या सांनिध्याची अपेक्षा असते. पण विद्येची गोष्ट तशी नाहीं. विद्या ही मूर्तिमंत देवता आहे. स्वदेशीं किंवा परदेशीं मनुष्याचें संरक्षण विद्यादेवीची

कृपादृष्टिच करते, आप्तमनुष्यांची गरज भासूं देत नाहीं, विद्यादेवीचा अनुग्रह हेंच मनुष्याचें अत्यंत शोभिवंत भूषण होय. विद्यादेवतेचा प्रसाद हाच द्रव्याचा ठेवा होय. विद्यादेवीच्या कृपावृष्टीनें ऐहिक व पारलौकिक सौख्याला व कीर्तीला उत्तरोत्तर भरतीच यावयाची, तोटा ह्मणून कधीं पडावयाचाच नाहीं. सारांश, विद्या ही सर्वश्रेष्ठ होय. ह्मणूनच राजे लोकांजवळ विद्येला जेवढा मान असतो तितका नुसत्या द्रव्याला नसतो. अर्थात् विद्यादेवीचें माहात्म्य अगाध आहे. ज्या मनुष्यावर विद्यादेवीची कृपा तिलमात्रहि नाहीं, तो केवळ पुच्छविषाणहीन पशुच होय.!

हितोपदेशांत प्रस्ताविकेमध्यें विद्यादेवीची स्तुति केली आहे, ती अशीः—

अजरामरवत्प्राज्ञो विद्यामर्थं च चिंतयेत् ॥
गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ॥ १ ॥
सर्वद्रव्येषु विद्यैव द्रव्यमाहुरनुत्तमम् ॥
अहार्यत्वादनर्घत्वादक्षयत्वाच्च सर्वदा ॥ २ ॥
संयोजयति विद्यैव नीचगापि नरं सरित् ॥
समुद्रमिव दुर्धर्षं नृपं भाग्यमतः परम् ॥ ३ ॥
विद्या ददाति विनयं विनयाद्याति पात्रताम् ॥
पात्रत्वाद्धनमाप्नोति धनाद्धर्मं ततः सुखम् ॥ ४ ॥
विद्या शस्त्रस्य शास्त्रस्य द्वे विद्ये प्रतिपत्तये ॥
आद्या हास्याय वृद्धत्वे द्वितीयाद्रियते सदा ॥ ५ ॥

यावरून विद्यादेवीचें श्रेष्ठत्व व्यक्त होत आहे. विद्यादेवीच्या आराधनेंत सर्वकाळ दंग असणारे भक्त पृथ्वीच्या पाठीवर आजपर्यंत अनेक होऊन गेले आहेत व या विद्याभक्तांनीं जगावर उपकार करण्याच्या बुद्धीनें अनेक उत्तमोत्तम ग्रंथ लिहून ठेवून आपलें नांव अमर करून ठेविलें आहे, सारांश,

विद्यादेवीचा महिमा असा आहे कीं, ज्या मनुष्याची श्रद्धा तिजवर बसते, त्याचें निरंतर कल्याणच व्हावयाचें.

मनुष्याची ऐहिक किंवा अध्यात्मिक उन्नति करण्याचा पाया घालण्याचा काळ बाळपण होय. लहानपणीं मुलांचीं मनें शुद्ध कोऱ्या कागदासारखीं स्वच्छ व एखाद्या कोंवळ्या वेला प्रमाणें वळवावीं तशीं सहज वळलीं जाणारीं असतात. ह्मणूनच हितोपदेशांत आरंभीं ह्मटलें आहे,

यन्नवे भाजने लग्नः संस्कारो नान्यथा भवेत् ॥

कुंभार मडकीं घडवूं लागला ह्मणजे तो त्यांचा आकार घडवितांना पाहिजे तसा करूं शकतो; पण एकदा तीं वाळावयास लागलीं ह्मणजे त्यांच्या रचनेंत कांहींच फरक करितां येत नाहीं. मुलांचीहि गोष्ट अशीच आहे. आपल्या भाषेंत एक जुनी ह्मण आहे, ' जो गुण बाळा तोच जन्मकाळा ! ' या साठींच प्राचीन ग्रंथकारांनीं ' कौमार आचरेत्प्राज्ञः ' अशा प्रकारचें वाक्य लिहून ठेविलें आहे. लहानपणीं जसे संस्कार मनावर होतात, जशा संवयी मनाला जडतात, तसेच सस्कार व त्याच संवयी अखेर पर्यंत कायम राहतात. एका ग्रंथकारानें ह्मटलें आहे कीं, " एकवेळ पायांतील मोठमोठ्या बेड्या तोडून टाकवतील, परंतु संवयीचा पाश तोडून टाकणें दुरापास्त आहे!" यासाठीं, लहानपणापासून मुलांना योग्य प्रकारचें शिक्षण मिळालें पाहिजे. हें शिक्षण देण्याचा जो अवधि त्यालाच विद्यार्थी अवस्था, किंवा विशेष तऱ्हेनें ह्मणावयाचें असल्यास 'विद्यार्थी आश्रम' असें ह्मणतां येईल.

राष्ट्राचें हिताहित मुख्यतः विद्यार्थी वर्गाच्या कर्तृत्वावर अवलंबून असतें. सुज्ञ व दूरदर्शी विद्यार्थ्यांस मुख्यतः देशस्थितीचें सुकाणूं हातीं घ्यावयाचें असतें. त्यांचें विद्यार्थी

अवस्थेंतून रूपांतर झाल्यावर त्यांस स्वधर्म व स्वदेश यांची कळकळ वाटावयास पाहिजे. ज्याच्या मनावर विद्याभ्यासापासून यथायोग्य संस्कार घडला आहे, ज्याच्या अंगीं स्वाभिमानाचें वारें वास करित आहे, व ज्याला ह्मणून आपल्या उन्नतीची प्रबलतर इच्छा आहे, त्याच्या हातून अनन्वित कृत्य सहसा घडावयाचें नाहीं आणि आपल्या कर्तव्य मार्गामध्यें कितीहि विघ्नराशि आडवे आले तरी त्यास त्यांची पर्वा वाटावयाची नाहीं. अशा प्रकारचें नीतिधैर्य मनुष्याचे अंतःकरणांत उत्पन्न करण्यास शिक्षण बीजरूपानें उपयोगीं पडतें. परंतु हें शिक्षणबीज योग्य वेळीं पेरिलें पाहिजे. पावसाळा सुरू होण्यापूर्वींच अगर पावसाळा खलास झाल्यावर बीं पेरणें जसें निरुपयोगी असतें, तसें शिक्षणाचा हंगाम निघून गेल्यावर किंवा त्याच्या अगोदर शिक्षणाचें अधिरोपण करणें फायदेशीर न होतां विनाकारण तापप्रद होतें. लहानपण अथवा विद्यार्थी अवस्था हीच शिक्षणाची योग्य वेळ–हंगाम आहे ! तो साधिला तर योग्यवेळीं सुफलोत्पत्ति व्हावयाची, हें निर्विवाद सिद्ध आहे.

मराठी सहाव्या पुस्तकांत ह्मटलें आहे, “ लहानपणीं मुलांचीं मनें जर चांगल्या गोष्टींकडे लावून सृष्टींतील पदार्थ पाहून, मग ते सचेतन असोत किंवा अचेतन असोत, त्यांविषयीं विचार करण्याची त्यांस संवय लाविली तर त्यापासून त्यांचा काल आनंदांत जाऊन त्यांस सुख होईल एवढेंच नाहीं, तर एकदां अशी संवय लागली ह्मणजे सृष्टपदार्थ हे कसकसे झाले आहेत, त्या परस्परांमध्यें संबंध कोणता आहे, कत्या पदार्थांचे साधारण धर्म कोणते आहेत, त्यांचे वर्ग कसकसे करावे, ते आतां ज्या स्थितींत आढळतात तिचें कारण काय, व ते प्रथमतः कसे होते, व त्यांस उत्पन्न कोणीं केलें,

असा विचार करण्याची त्यांस संवय लागेल; आणि अशा रीतीनें सृष्टीपासून सृष्टिकर्ता जो परमेश्वर त्याचें त्यांस कांहीं ज्ञान होईल ! " यावरून हें उघड आहे कीं, या विश्वरूप मनोहर प्रदर्शनांत मनुष्य एकदां प्रविष्ट झाला ह्मणजे त्याच्या मनोभूमिकेमध्यें जगांतील भिन्नभिन्न व्यवहार व अनेक अलौकिक चमत्कार यांविषयीं सम्यक्ज्ञानात्मक जिज्ञासा-वल्ली प्रगट होऊन कालावधीनें क्रमानुसार तिला शिक्षणरूपी जलाचें सिंचन व द्रव्यरूप खत योग्य वेळीं मिळत गेलें असतां तिची वाढ जोरानें होते व तिजवर सुविचाररूपी फळें येऊं लागतात ! तीं सृष्टिनियमानुसार पक्व दशेला आलीं ह्मणजे मनुष्याचें कोटकल्याण करितात ! यावरून लहानपणीं शिक्षणाच्या योगानें बुद्धीचा विकास उत्तरोत्तर कसकसा होत जातो, हें कोणाच्याहि सहज ध्यानांत येण्यासारखें आहे.

शिक्षणाचे प्रकार तीन आहेत. पहिला–मुलाच्या बुद्धीस शिक्षण देणें; दुसरा–मनोवृत्तींना योग्य वळण लावणें; तिसरा–शरीरास शिक्षण देणें. बुद्धीस शिक्षण देणें ह्मणजे मनुष्याची धारणाशक्ती, कल्पना, तर्क, ग्राहकता इत्यादि शक्ति बळावून पूर्व स्थितींत येण्याकरितां लहानपणापासून त्याजकडून विद्याभ्यास करविणें. मनोवृत्ति किंवा वासना यांस शिक्षण देणें ह्मणजे मुलाच्या अंगीं सदाचरणाविषयीं कळकळ आणि दुराचरणाविषयीं तिरस्कार उत्पन्न होईसें करणें. शरीरास शिक्षण देणें ह्मणजे, तें बळकट व श्रम सो-सणारें असें करणें. ह्या तिन्ही प्रकारच्या शिक्षणाकडे पहिल्यापासून लक्ष्य दिल्याशिवाय कोणताहि मनुष्य सर्व-प्रकारें प्रगल्भदशेस येऊन स्वसुखास व परोपयोगास समर्थ होणार नाहीं. नुसती बुद्धीची वाढ झाली, केवळ सदाचरणा-कडे प्रवृत्ति असली, अथवा नुसत्या शरीराची तयारी

नीटपर्ण ठेविली ह्मणजे शिक्षणाचा कार्यभाग आटपला असें कदापि ह्मणतां यावयाचें नाहीं. वास्तविक ह्या तिन्ही प्रकारच्या शिक्षणाच्या समृद्धीचें जें संमेलन तेंच खरें शिक्षण होय. हें शिक्षण बाल्यावस्थेपासून संपादण्याचा क्रम ठेविला तरच तें भावी स्थितीला उपयोगी पडतें. 'तहान लागली कीं लागा विहीर खणावयाला' अशा प्रकारचें उडाणटप्पूपणाचें शिक्षण कांहीं कामाचें नाहीं. यापासून काडी मात्रहि हित न होतां उलट त्रास होतो. यास्तव, लहानपणापासून विद्याभ्यासाकडे निरंतर प्रवृत्ति असणें भावीस्थितीमध्यें कल्याणकारक होतें, हें उघड आहे.

विद्यार्थी आश्रमाचीं मुख्य दोन अंगें आहेत. एक विद्याभ्यास आणि दुसरें सदाचरण. आरोग्य उत्तम प्रकारचें राहण्यास, अंगांत जोम व तरतरी असण्यास आणि आयुर्मर्यादा वाढविण्यास सदाचरण अत्यंत अवश्य आहे. ब्रह्मचर्य हें सदाचरणाचें एक मुख्य तत्व आहे. इतर सर्व सद्गुण असून जर का ब्रह्मचर्याची अपूर्तता असेल तर त्यांची किंमत कांहींच नाहीं ह्मटलें तरी चालेल. मुख्यत: ब्रह्मचर्यव्रतावरूनच आयुष्याच्या प्रथम भागाला ब्रह्मचर्याश्रम असें नांव मिळालें आहे. ब्रह्मचर्य हा पहिला आश्रम आहे. अर्थात् गृहस्थाश्रमाचें सर्व धोरण ब्रह्मचर्याश्रमावर असतें. चार आश्रम ह्या मनुष्याच्या ऐहिक व पारलौकिक उन्नतीच्या चार पायऱ्या आहेत. ही प्रत्येक पायरी क्रमाक्रमानेंच चढून जावयाचें असतें. पहिल्या दोन आश्रमांमध्यें मनुष्याची ऐहिक उन्नति होत असते तिसऱ्या (वानप्रस्थाश्रमा) मध्यें पारलौकिक उन्नतीला प्रारंभ होऊन चवथ्या (संन्यासी आश्रम) मध्यें तिची पूर्णता होते. परंतु आपण हें पक्कें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, ब्रह्मचर्याश्रम हा आयुष्यरूपी इमारतीचा पाया आहे व

हा पाया मनाला आटोक्यांत ठेवोल्या शिवाय—आत्मसंयमन केल्याशिवाय नोटपणें बसावयाचा नाहीं. ' मनो दुर्निग्रहं चलम्' असें जें गीतेमध्यें ह्मटलें आहे तें सर्वस्वी खरें आहे. 'मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः' हें वाक्य नेहमीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. प्राचीन ग्रंथांत ब्रह्मचर्याचें लक्षण असें सांगितलें आहेः—

स्मरणं कीर्तनं केलिः प्रेक्षणं गुह्य भाषणम् ॥
संकल्पोऽध्यवसायश्च क्रियानिष्पत्तिरेवच ॥
एतन्मैथुनमष्टांगं प्रवदंति मनीषिणः ॥
विपरीतं ब्रह्मचर्यमेतदेवाष्टलक्षणम् ॥

यावरून ब्रह्मचर्याश्रमामध्यें उच्छृंखल होणाऱ्या मनाची पवित्रता असणें किती अवश्य आहे बरें? प्रौढ विद्यार्थी जनहो, ब्रह्मचर्यव्रत पाळण्याच्या योगानें आयुष्याची वृद्धि होते. चरकांनीं ह्मटलें आहेः—

ब्रह्मचर्यमायुष्य (वृद्धि) कराणां पदार्थानाम् ॥

यावरून ब्रह्मचर्याशीं आयुष्याचा किती निकट संबंध आहे बरें?

ब्रह्मचर्य राखण्यास मुख्य उपाय ह्मटला ह्मणजे मन शुद्ध ठेविणें हा होय. व्यायाम न करणें, नाटकें, कादंबऱ्या व इतर चावटपणानें भरलेलीं घाणेरडीं चोपडीं वाचणें, अश्लील भाषणें करणें, अश्लाघ्य विषयांची चर्चा करणें ह्या गोष्टी मनः शुद्धीला प्रतिबंधक आहेत. या शिवाय आणखी एका गोष्टीनें मनाचें पावित्र्य नष्ट होतें. ती गोष्ट ' कुसंगति' ही होय. दुराचरणी लोकांची संगति जितकी टाळवेल तितकी टाळावी. संगतीविषयीं एक संस्कृत सुभाषित प्रसिद्ध आहे, तें हेंः—

सत्संगाद्भवति हि साधुता खलानाम् ॥ साधूनां नहि
खलसंगमात्खलत्वम् ॥ आमोदं कुसुमभवं मृदेव धत्ते ॥
मृद्गंधं नहि कुसुमानि धारयंति ॥ १ ॥

याचेंच मराठी भाषांतर असें आहेः—

खळा येतें साधुत्व साधुसंगें ॥ दुष्टसंगें साधुत्व तें न भंगे ॥ पुष्पसंगें मातीस वास लागे ॥ मृत्तिकेचा पुष्पांत गुण न वागे ॥ १ ॥

यावरून सत्संगतीचा महिमा कसा आहे व कुसंगतीचा परिणाम कसा होतो हें अगदीं उघड आहे. जोंपर्यंत मनाला शृंगारिक विषयांचा विटाळ झाला नाहीं, तोंपर्यंत मनोवृत्ति तरतरीत असतात, अंगामध्यें कोणतेंहि काम करण्याची धमक व चलाखी असते व कितीहि परिश्रम केले तरी गात्रांस शीण येत नाहीं. सारांश, आरोग्य उत्तम प्रकारचें राहण्यास जसा व्यायाम अवश्य पाहिजे, त्या प्रमाणें सदाचरणरूप असिधाराव्रत अखंड पाळलें जाण्यास ब्रह्मचर्य अत्यंत अवश्य आहे.

वरील विवेचनावरून ' विद्याभ्यास ' व ' ब्रह्मचर्य ' ह्या दोन गोष्टींमुळें ' विद्यार्थी आश्रमा ' ला केवढें महत्व आलें आहे हें उघड आहे. मनुष्याच्या इतिकर्तव्यतारूप इमारतीचा पाया ज्या आश्रमामध्यें घातला जातो, मनुष्याच्या आयुष्यक्रमाचे ' विद्याभ्यास ' आणि ' सदाचरण ' हे दोन आधारस्तंभ ज्या आश्रमामध्यें उभारले जातात, मनुष्याच्या जीवितसाफल्याचा उद्गम ज्या आश्रमामध्यें जागृत केला जातो, त्या ' विद्यार्थी आश्रमाचें ' महत्व किती ह्मणून सांगावें ! आहाहा ! एकदां ह्या आश्रमाच्या मर्यादेचें उल्लंघन झालें ह्मणजे कोटयवधि रुपये खर्चिले अगर भगिरथ प्रयत्न केले तरी ह्याची प्राप्ति होणें शक्य आहे काय ? तो शिक्षकांचा कळकळीचा उपदेश, मित्र मंडळीचा तो प्रेमपूर्वक विनोद, विद्यालयांत भक्तिपुरःसर वास करण्याची ती उत्सुकता विद्यार्थी आश्रमांतून निष्क्रमण झाल्यावर अनुभवास येतात

काय ? विद्यार्थी आश्रमामध्यें कुटुंब भरणाची फारशी काळजी वहावी लागत नाहीं, हा लहानसहान फायदा आहे काय? तात्पर्य, अनेक दृष्टींनीं पाहतां विद्यार्थी आश्रम अत्यंत महत्वाचा आहे ह्या आश्रमाच्या संस्थितीवरच भावी चरित्राचा बराच भाग अवलंबून असतो, हें लक्ष्यांत आणिलें म्हणजे ह्याचें महत्व व्यक्त होतें.

उपसंहार.

हल्लीं आपल्या देशांतील तरुण विद्यार्थी मंडळीपुढें, 'विद्या शिकावयाची कशा करितां' असा एक प्रश्न उभा राहतो. प्रत्येक विद्यार्थी आपल्या परिस्थितीचा व कर्तृत्वाचा योग्य विचार करून ह्या प्रश्नाचा उलगडा करण्यास प्रवृत्त होतो, असें म्हणतां येत नाहीं. कारण, अनेक विद्यार्थी 'गतानुगतिक' असतात, म्हणजे एक ज्या मार्गानें गेला त्याच मार्गानें जाण्याकडे दुसऱ्याची प्रवृत्ति होते. सांप्रत आपल्या देशाच्या स्थितीचा विचार केला तर आपणास दोन गोष्टी स्पष्टपणें दिसून येतात. पहिली ही कीं, विद्यार्थी आश्रमाची मर्यादा समाप्त होण्यापूर्वीच पुष्कळ विद्यार्थ्यांना कुटुंबभरणाच्या कचाट्यांत सांपडावें लागतें. प्राचीन काळीं वयाच्या वीस पंचवीस वर्षांपर्यंत प्रस्तुत आश्रमाची ईयत्ता असे. पण आतां पहाल तर पंधरा वर्षांपासूनच कित्येक विद्यार्थ्यांस पोटाच्या मागें लागावें लागतें ! अर्थात् विद्याभ्यासावर व विद्यार्थी आश्रमांतील कर्तव्यकर्मावर पाणी पडलेंच ! दुसरी गोष्ट ही कीं, 'नौकरी मिळविण्या करितांच विद्या शिकावयाची' अशा प्रकारची आमच्या देशांतील लोकांची समजूत दिवसानुदिवस बळावत चालली आहे ! 'सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः' या प्राचीन वाक्याला

हरताळ लागत चालला आहे ! कारण, जिकडे पहावें तिकडे चाकर नोकर लोकांची रेलचेल ! आतां कालक्रमानुसार ह्या देशाची उत्तरोत्तर अवनति होत आहे ही गोष्ट निराळी पण देशाच्या अवनती बरोबरच देशांतील लोकांच्या बुद्धी-चाहि क्षयच होत चालला आहे, असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें. इंग्लंड सारख्या सुधारलेल्या राष्ट्रांत नानाप्रकारचे कारखाने उभारले आहेत, प्रत्यहीं शास्त्रीयशो-धांची चिकित्सा करण्यांत हजारों विद्वान् लोक पैसा व वेळ प्रशस्तपणें खर्च करित आहेत व आपापल्या राष्ट्रांचा उत्कर्ष करण्याकरितां अहर्निश डोळ्यांत तेल घालून प्रयत्न करित आहेत ! परंतु ह्या हिंदुस्थान देशाची स्थिति अगदीं भिन्न आहे, ही अत्यंत दुःखाची गोष्ट होय !

प्रौढ विद्यार्थीजनहो, प्रस्तुत पुस्तकाचें नांव 'सन्मार्गोप-देश' असें आहे. तेव्हां, आयुष्याचा क्रम कशा रीतीनें ठेविला असतां आपल्या जन्माचें योग्य सार्थक्य होईल, ह्याची दिशा स्पष्टपणें दाखविणें इष्ट आहे. परंतु परिस्थिति-भिन्नत्व व रुचिवैचित्र्य या दोन कारणांमुळें, अमुकच मार्गानें गेलें असतां विद्यार्थ्यांचें निःसंशय कल्याण होईल असें सांगतां येणें अशक्य आहे. परंतु पूर्वी प्रतिपादन केलेल्या अनेक विषयांवरून कोणत्या मार्गानें गेलें असतां आपल्या जन्माचें साफल्य होईल याचा निर्णय करण्यास बरेंच साह्य होईल असें मानण्यास जागा आहे. तुह्मी कोणताहि उद्योग करा. पण जो उद्योग करावयाचा तो सदाचरण, आरोग्य, नियमितपणा आणि ईश्वरनिष्ठा ह्या चार अक्षय्य व जोरदार आधारस्तंभांवर अवलंबून करा ह्मणजे झालें. प्रस्तुत पुस्त-काचा उद्देश सन्मार्गाची दिशा दाखविणें, वाटेंत येणाऱ्या अडचणींचें निवारण कसें करावें हें सुचविणें, व जीवनयात्रा

निश्चयाचें बळ । तुका ह्मणे तेंचि फळ! ॥
तेव्हां, आपल्या इष्ट मार्गांत विघ्नांचे कितीहि डोंगर. आडवे आले, तरी धैर्य सोडूं नये. निश्चय कायम ठेवावा. आपलीं कर्तव्यें योग्य रीतीनें बजावावीं, ह्मणजे आपल्या प्रयत्नांस आजना उद्यां केव्हां तरी यश यावयाचेंच.

सांप्रत आपल्या ह्या भरतखंडास सर्वतोपरी हीनदशा आलेली आहे. प्लेग, दुष्काळ, अकालिक वृष्टि इत्यादि अनेक कारणांमुळें दिवसानुदिवस लोकांमध्यें त्राण नाहीसें होत चाललें आहे, व एकंदरीनें ह्या प्राचीन वैभवसंपन्न राष्ट्राचा ऱ्हास होऊं लागला आहे! असें कां व्हावें बरें? हिंदुस्तानच्या प्राचीन व अर्वाचीन स्थितीची तुलना केली तर पूर्वीपेक्षां हल्लीं विलक्षण फरक—जमीन अस्माना इतका!—आहे, असें आढळून येईल! चक्रगतिन्यायानें आपणास आज विपन्नावस्थेमध्यें रहावें लागत आहे, ही गोष्ट खरी पण आपण सर्वकाळ ह्याच स्थितींत रहावें काय? ह्या स्थितींतून आपली मुक्तता होण्यास कोणताच मार्ग खुला नाहीं काय? विचार केला असतां आपणास असें दिसून येईल कीं, आपली स्थिति सुधारणें अद्यापि आपल्या हातीं बरेंच आहे. जीवनसंग्रामाच्या कचाट्यांत सांपडून जरी बहुतेक वेळ सेवाधर्मामध्यें व संसार व्यापारामध्यें जात असला, तरी मनुष्यानें शांतवृत्ति ठेवून यथाशक्ति 'जन्मसार्थक्या' ची कल्पना अहर्निश अंतःकरणामध्यें जागृत ठेवून तदनुसार वर्तनक्रम ठेविला तर आपले इष्ट हेतु साध्य होण्यास विलंब लागणार नाहीं. जो मनुष्य स्वशक्त्यनुरूप ज्ञानसंपादन करून परमेश्वरावर पूर्ण निष्ठा ठेवन सदाचरणानें वागत आहे, त्याला कधींना कधीं तरी संतोषप्रद सुस्थिति प्राप्त झालीच पाहिजे असा जगाचा नियम आहे. तो निरंतर लक्ष्यांत ठेवून वागावें हें उचित होय. अशा

रीतीनें प्रत्येक मनुष्य वागूं लागेल तर राष्ट्रोन्नति होणें अशक्य आहे असें नाहीं. प्रत्येक कुटुंबांतील सुधारणेची जी बेरीज तीच राष्ट्रोन्नति होय. यासाठीं, प्रिय विद्यार्थी जनहो, आपणावरील कर्तव्यांची जबाबदारी ओळखा कधीं कर्तव्यपराङ्मुख होऊं नका. कर्तव्यानुसरण हेंच उन्नतीचें बीज हें ध्यानांत असूं द्या. उच्च विचार केवळ भाषणद्वारा अगर लेखनद्वारा व्यक्त करूनच राहूं नका, तर त्यांप्रमाणें प्रत्यक्ष कृति करून दाखवा, ह्मणजे तुमचें खचित कल्याण होईल.

हल्लीं सुधारणेच्या शिखरावर आरूढ झालेल्या पाश्चात्य राष्ट्रांच्या इतिहासाचें जर आपण सूक्ष्मदृष्टीनें अवलोकन केलें तर त्यांच्या आधुनिक उत्कर्षाचें मूळ कारण कित्येक नररत्नांचे अलौकिक स्तुत्य प्रयत्न होत असें दिसून येईल. ज्यांनीं राष्ट्राच्या कल्याणाकरितां आपले अमूल्य देह खर्ची घातले, विद्याव्यासंगापुढें ज्यांनीं ऐहिक सुखोपभोग तुच्छ मानिले, शास्त्रीय ज्ञानसंपादनामध्यें ज्यांनीं आपल्या तनुमनधनाची आहुति देण्याचा प्रसंग आला असतां माघार घेतली नाहीं, अशा कित्येक मानवरत्नांच्या असामान्य प्रयत्नांचें फळ हल्लीं पाश्चात्य राष्ट्रें सेवन करित आहेत, असें कोणीहि विचारी मनुष्य सहज कबूल करील. कोपर्निकस, ग्यालिलियो, न्यूटनसारख्या शास्त्रज्ञांनीं, मॅझिनी, गॅरिबाल्डी, वॉशिंग्टनसारख्या नामांकित रणशूरांनीं, स्कॉटसारख्या कादंबरीकारांनीं, मेकॉलेसारख्या प्रसिद्ध इतिहासलेखकांनीं, ग्लॅडस्टनसारख्या सर्वश्रेष्ठ मुत्सद्यांनीं, हर्बर्टस्पेन्सरसारख्या सर्वमान्य तत्ववेत्त्यांनीं व प्रो० मॅक्समुल्लरसारख्या विद्वज्जनाग्रणींनीं अपरंपार प्रयत्न करून आपल्या राष्ट्रांचें सर्वथैव कल्याण केलें व आपल्या जन्माचें सार्थक केलें हें आपण लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. तसेंच, हल्लीं जपानी वीर जिवावर

उदार होऊन आपल्या राष्ट्राच्या कल्याणाकरितां रशियासारख्या सामर्थ्यवान् राष्ट्राशीं टक्कर मारित आहेत, व त्यांची निस्सीम दृढ भक्ति अवलोकन करूनच किं काय विजयश्री त्यांना माळ घालित आहे, हें हि आपण ध्यानांत ठेविलें पाहिजे. सारांश, जगामध्यें जें जें ह्मणून अनुकरणीय कृत्य असेल, तें तें निरभिमानानें व उल्हासानें करण्यास आपण शिकलें पाहिजे.

वर पाश्चात्य राष्ट्रांतील नामांकित पुरुषरत्नांचा उल्लेख केला, यावरून आपल्या राष्ट्रांत अनुकरणीय व्यक्ति झाल्याच नाहींत असें कोणी बहुधा समजणार नाहीं. पौराणिक काला मध्यें तर अनेक अनुकरणीय महात्मे होऊन गेले. पण अर्वाचीन काळीं देखील श्रीसमर्थ रामदास, तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर प्रभृति साधुवर्य, तसेंच छत्रपति शिवाजी महाराज, ब्रह्मेंद्रस्वामी ह्यांनीं स्वकृतींनीं आपणास "सन्मार्गोपदेश" करून ठेविला आहे. तेव्हां त्याला अनुसरून वागण्यामध्यें महत्कल्याण आहे, हें आपण सर्वांनीं निरंतर ध्यानांत ठेविलें पाहिजे.

प्रिय विद्यार्थी जन हो, 'विद्यार्थी आश्रम' समाप्त झाल्यावर संसाराची जबाबदारी केव्हां तरी घ्यावी लागणारच. विद्यार्थी आश्रमांतील कर्तव्यकर्मे योग्य रीतीनें बजाविलीं असलीं, ह्मणजे या संसारसमुद्रांतून आपली जीवननौका अनेक संकटरूप खडकांस न भितां व न डगमगतां सुरक्षितपणें इष्टस्थळीं पोहोंचेल हें लक्ष्यांत ठेवा. सारांश, विद्याभ्यास, विशिष्टकला ज्ञानसंपादन, आरोग्यरक्षण हीं तीन विद्यार्थ्यांचीं कर्तव्यें यथासांगपणें बजावून परमेश्वरभक्ति, सदाचरण, उद्योग आणि नियमित-

पणा या चार भरभक्कम आधारस्तंभांनीं आपली जीवितसा
कतारूप इमारत अक्षय सुदृढ करून ठेवा, हेंच, कळकळ
सांगणें आहे !

आपणाजवळ द्रव्य सहाय नाहीं, अनुकूळ परिस्थि
नाहीं, विद्याभ्यास साधन सामग्री नाहीं, असें ह्मणून खिन्न
निराश होऊन राहूं नका. ' विद्या ' ही कामधेनु आहे. तिच
अंत:करण पूर्वक निस्सीम भक्ति करा, ह्मणजे तुमचे उद्दे
सफळ होतील. ज्ञानाचा आश्रय करा, ह्मणजे जगांत तुम्हाल
असाध्य असें कांहीं राहणार नाहीं सांप्रत मनुष्य सकल प्राणि
वर्गाचा राजा झाला आहे, ह्याचें आदिकारण ज्ञान होय. या
संबंधीं जॉन्सनचें " Knowledge will always predonuna-
te over ignorance as man governs other animals ! "
हें वाक्य लक्ष्यांत ठेवा. इंग्लिश भाषेमध्यें ह्मण आहे कीं
" Where there is mill theve is way ! " याचा अर्थ असा
कीं, एखादें कृत्य करण्याची इच्छा असली ह्मणजे कांहींतरी
मार्ग उपलब्ध होतोच. पण जर मन निरिच्छ असलें, तर
अनुकूल परिस्थिति व साधनसामग्री असून हि व्यर्थ होते.
या साठीं, प्रिय विद्यार्थी जन हो, सद्विचारानें वागा. सन्मार्ग
डोळ्यांपुढें असूंद्या. सदुपदेशाकडे दुर्लक्ष्य करूं नका. नीति-
धैर्य अंगीं आणा. उत्साहशक्ति वृद्धिंगत होऊंद्या. सारांश, जेणें
करून आपल्या जन्माचें साफल्य होईल व आपल्या कर्तृ-
त्वाचा इतर लोकांस उपयोग होईल असा वर्तनक्रम सर्वकाल
अव्याहत ठेवा, ह्मणजे तुह्मी नि:संशय उत्तम कल्याणास
पात्र व्हाल !

समाप्त.

C
—
206